दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रु. ४.०० I अंक ३४२ I शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

साईवेद प्रकाशन
विचारांचा प्रकाश, परिवर्तनाची दिशा
URGENTLY REQUIRED
RECEPTIONIST / TELECALLER - 01
Apply on mail:
saived.print@gmail.com
INTERVIEW DATE: 28 SEPTEMBER 2026
SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED
Office: Daily Rashtra Sahyadri Office,
Opposite Mac Care Hospital, Zopdi Canteen, Ahilyanagar.
Mo: 7588605255

# सरकारची मदतीची 'घोषणा' अन् विरोधकांचा 'आक्रोश'

## दुष्काळाच्या 'ट्रिगर वन'नुसार आज मदतीचा आदेश

- दिवाळीपूर्वी मदत देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन
- शरद पवार गटाचा २६ सप्टेंबरला पंढरपुरात मोर्चा
- अहिल्यानगरसह राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष शासन निर्णयाकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे राज्यातील अनेक भागांत खरीप पिके संकटात सापडली असताना दुष्काळाच्या प्रश्नावर सरकार आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वाशिम-अमरावती दौऱ्यात दुष्काळ संहितेतील 'ट्रिगर वन'नुसार शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २५ सप्टेंबरला शासन आदेश काढण्यात येईल, अशी घोषणा केली. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीची मदत देण्यात येईल, तसेच ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या अहिल्यानगरसह राज्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र प्रत्यक्ष मदत कोणत्या गावांना मिळणार, नुकसानाचे निकष काय असतील आणि मदतीची रक्कम किती असेल, याचे चित्र शासन आदेशानंतरच स्पष्ट होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर उत्पादन घटण्याचे संकट आहे. काही भागांत पिके वाचविण्यासाठी उपलब्ध पाण्याचा आधार घेतला जात असला, तरी आगामी काळातील चारा, पाणी आणि रब्बी हंगामाचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

यामुळे 'ट्रिगर वन'च्या निकषात जिल्ह्यातील कोणते भाग येतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुरुवातीच्या प्रक्रियेत काही भाग वगळला गेला तरी पुढील 'ट्रिगर'मध्ये त्यांचा समावेश केला जाईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पीकस्थिती आणि स्थानिक परिस्थितीच्या आधारे वंचित भागांनाही मदतीची संधी मिळणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मुख्यमंत्र्यांनी दुष्काळग्रस्त भागात पिकांसोबत चारा आणि पाणीटंचाईवर उपाययोजना, गरजेनुसार अन्नधान्याची मदत, तसेच शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी मदत करण्याचे संकेत दिले आहेत. रब्बी पिकांसाठी उपलब्ध पाण्याचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत केली जाणार असून, रोजगारनिर्मितीसाठी जलसंधारणाच्या कामांनाही प्राधान्य देण्याचे त्यांनी सांगितले. आटलेल्या जलसाठ्यांतील गाळ काढणे, तलावांची दुरुस्ती आणि जलसंधारणाच्या संरचनांची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

शासनाने कर्जमाफीची अंमलबजावणी सुरू असून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच शासकीय दराने शेतमाल खरेदीसाठी लवकरच नोंदणी सुरू करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. सरकारकडून मदतीची घोषणा होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने दुष्काळाच्या मुद्द्यावर सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पक्षाचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली २६ सप्टेंबरला पंढरपुरात शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, ही मोर्चाची प्रमुख मागणी आहे. मोर्चाच्या नियोजनासाठी गुरुवारी पंढरपुरात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. सोलापूर जिल्ह्यात खरीप पिकांचे नुकसान, उसाच्या वाढीवर परिणाम आणि चाराटंचाईचा प्रश्न गंभीर असल्याचा दावा पक्षाच्या नेत्यांनी केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा आता शासन आदेशात किती वेगाने आणि किती प्रभावीपणे उतरते, यावर शेतकऱ्यांच्या मदतीचे वास्तव अवलंबून राहणार आहे. विशेषतः अहिल्यानगरसारख्या मोठ्या कृषिप्रधान जिल्ह्यात गावनिहाय पीकस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन पात्र शेतकऱ्यांना मदत मिळणे महत्त्वाचे ठरणार आहे. उद्याचा शासन आदेश आणि त्यानंतरची अंमलबजावणी, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### पीकविम्यावरही आरोप-प्रत्यारोप

दुष्काळाच्या प्रश्नाबरोबरच पीकविमा आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या म दतीच्या आकडेवारीवरूनही सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये मागील वर्षी जाहीर करण्यात आलेल्या मदतीची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि पीकविम्याच्या रकमेसंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी विविध रकमेचे दावे करत सरकारकडून स्पष्टीकरणाची मागणी केली आहे. या आकडेवारीची स्वतंत्र अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे, हेही महत्त्वाचे आहे.

### दुष्काळाच्या राजकारणापेक्षा आता मदतीची प्रतीक्षा

राज्यातील शेतकऱ्यांसमोर सध्या मुख्य प्रश्न राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा नसून हातचे पीक गेल्यानंतर कुटुंबाचा आर्थिक गाडा कसा चालवायचा, हा आहे. खरीप हंगामातील नुकसान, पुढील रब्बीची चिंता, जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी, शेतीसाठी वीज आणि कर्जाचा वाढता भार या सगळ्यांचा एकत्रित परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत आहे.

## लाऊडस्पीकर लावायचाय...
# तर १ लाख रुपये मोजावेत लागणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ध्वनीप्रदूषण : उच्च न्यायालयाचा सांस्कृतिक मंडळांना दणका**



**मुंबई :** सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक सभांमध्ये होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी उच्च न्यायालयाने अत्यंत कडक पाऊल उचलत कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रम ांसाठी किंवा उत्सवांसाठी लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देताना संबंधित मंडळांकडून ठेव म्हणून तब्बल १ लाख रुपये जमा करून घेण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

**ऐन गणपती विसर्जनाच्या पूर्वसंध्येला हे आदेश येणं अपेक्षित असल्याने त्याची अंमलबजावणी करण्याचे मोठ आव्हान पोलीस आणि प्रशासनावर असेल. मंगळवारच्या सुनावणीत ढोल-ताश्यांम ध्ये हातोड्याने बडवण्यात येणाऱ्या सिलेंडरवर देखील बंदीचे उच्च न्यायालयाने संकेत दिले होते. तसेच मिरवणुकीत मंडळांनी त्यांना दिलेली परवानगी जाहीर प्रदर्शित करावी अन्यथा ध्वनिक्षेपक लावता येणार नसल्याचही उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं होतं. तसेच भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचना देत उल्लंघन समोर आल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या उच्च न्यायालयाच्या सूचना दिल्या होत्या. ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसं?असा सवाल उपस्थित करत राज्य सरकारला उच्च न्यायालयाने धारेवर धरलं होतं.**

फक्त सार्वजनिक मंडळेच नव्हे, तर वैयक्तिक पातळीवर जर एखादी व्यक्ती लाऊडस्पीकर अथवा ध्वनिक्षेपक वापरण्याची परवानगी मागत असेल, तर तिलाही ५० हजार रुपये डिपॉझिट म्हणून जमा करावे लागणार आहेत. या निर्णयामुळे विनाकारण किंवा नियमांचे उल्लंघन करून लाऊडस्पीकर वाजवणाऱ्यांना मोठा आघात बसणार आहे.

उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देतानाच प्रशासनाकडून आवाजाच्या मर्यादेबाबत कडक अटी व शर्ती घालून दिल्या जातील. या अटींचे पालन करणे प्रत्येक आयोजकाला अनिवार्य असणार आहे. जर एखाद्या मंडळाने किंवा व्यक्तीने दिलेल्या परवानगीतील आवाजाच्या(पान ४ वर)

## महत्वाचे..

### बीड जिल्ह्यात सर्वाधिक खोटे गुन्हे दाखल होतात

बीड : वाढती गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार, खंडणी, खून, अपहरणासारख्या घटनांनी बदनाम झालेल्या बीड जिल्ह्यात सर्वाधिक खोटे गुन्हे दाखल होतात, अशी खळबळजनक कबुली अपर पोलीस अधिक्षकांनीच दिली.

आधीच बदनाम असलेल्या पोलीस दलासाठी हा घरचा आहेर डोकेदुखी ठरणार आहे. पिंपळनेर प्रकरणातील गंभीर गुन्ह्यावर बोलताना असे खूप गुन्हे होतात, अशी उडवाउडवीची उत्तर देत केलेल्या अपर अधीक्षकांच्या विधानाने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात कायदा अन् सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, सर्व पोलीस ठाणेप्रमुख आणि कर्मचार्यांना शिस्त लावण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे आक्रमक धोरण राबवत आहेत. मात्र, त्यांच्या या धोरणाला खात्यातील वरिष्ठ सहकाऱ्याकडून कसा हरताळ फासला जातो हे अपर पोलीस अधीक्षकांच्या बेजबादार विधानाने समोर आले आहे. पत्रकार परिषदेत अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी केलेल्या विधानामुळे पोलीस दलाच्या कार्य पद्धतीवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### सुटीची सूचना

**आज दि. २५ सप्टेंबर अनंत चतुर्दशी गणपती विसर्जन निमित्त दै. राष्ट्रसह्याद्री कार्यालयास सुटी असल्याने २६ सप्टेंबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही. तरी वाचक, वितरक आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.**

**-संपादक**

# शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात दोन दिवसात अधिसुनचा

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची शिर्डीत घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून, पीक विमा, कर्जमुक्ती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात पुढील दोन तीन दिवसांमध्ये शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात अधिसुना काढण्यात येणार आहे. अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील पिंपळे येथे शेतकरी सोपान चकोर यांच्या शेताच्या बांधावर जाऊन कृषीमंत्री भरणे यांनी नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून पावसाचा खंड, पिकांची अवस्था आणि शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या. पिंपळे गावातील काही शेतकऱ्यांना पीक विम्याबाबत येत असलेल्या अडचणींची तातडीने दखल घेत कृषी व महसूल विभागाने चालू खरीप हंगामात आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. सोयाबीनची ११३.०३ टक्के, कपाशीची ९१.६६ टक्के, मक्याची १६३.३४ टक्के, तुरीची १३४.३२ टक्के पेरणी झाली आहे. सोयाबीन शेंगा भरण्याच्या अवस्थेत असून पाण्याच्या ताणामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमिवर छत्रपती संभाजीनगर, (पान ४ वर)

# महिला शेतकऱ्याची आत्महत्या !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** दुष्काळी परिस्थिती, शेतीतून अपेक्षित उत्पन्न नाही, डोक्यावर वाढत गेलेला कर्जाचा बोजा आणि त्यातच आजारपणाच्या उपचारांचा खर्च अशा आर्थिक विवंचनेतून खडकी (ता. अहिल्यानगर) येथील दीपाली प्रकाश रोकडे (वय ३७) या शेतकरी म हिलेने घराजवळील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी रात्री( दि.२३) घडली. जिल्ह्यातील ही पहिलीच घटना असावी की एका शेतकरी महिलेने आत्महत्या केली आहे. दीपाली रोकडे यांच्या कुटुंबाकडे अवघी साडेतीन ते चार एकर शेती आहे. शेती आणि मोलमजुरीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. मात्र, गेल्या काही काळात कुटुंबावरील आर्थिक संकट वाढत गेले. दोन वर्षांपूर्वी घर बांधण्यासाठी घेतलेले हातउसने स्वरूपातील सुमारे चार ते पाच लाख रुपयांचे कर्ज, त्यानंतर अलाहाबाद बँकेचे सुमारे एक लाख रुपये, सेवा सोसायटीचे सुमारे ४० हजार रुपये तसेच खेळते भांडवल कर्जाचे ३५ हजार रुपये, असा कर्जाचा मोठा बोजा(पान ४ वर)

# भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाचा मृत्यू

## सर्वपक्षीय रास्ता रोको : भिंगार कडकडीत बंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** भिंगार येथे वामन जयंतीच्या दिवशी काढण्यात आलेल्या गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान तरुणाचा मृत्यू झाला. दीपक वागस्कर असे या तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर भिंगार गणेश मंडळाचे कार्यकर्ते आक्रमक झाले. या तरुणाला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात (पान ४ वर)

### १९ तासानंतर गणेश विसर्जन व वागस्कर यांचा अंत्यविधी

पोलीस अधीक्षकांनी यशस्वी मध्यस्थी केल्यानंतर गुरुवारी सायंकाळी सात वाजता भिंगार मिरवणुकीतील थांबवलेले गणेश विसर्जन करण्यात आले. तसेच, मयत दीपक वागस्कर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अंत्यविधीला पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, अनिल मोहिते, संपत बारस्कर, अविनाश घुले, विनीत पाऊलबुध्ये, मनोज दुलम, निखिल वारे, अनिल धवन, अमोल येवले आदी उपस्तित होते.

# न्यायालयाच्या नावाखाली जिल्हा परिषदेमध्ये वेगळाच खेळ

## शिक्षण विभागाच्या पदोन्नती प्रक्रियेची राज्यात चर्चा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शिक्षक पदोन्नती संदर्भात न्यायालयामध्ये जिल्ह्यातून विविध प्रकारच्या आव्हान याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित असताना एका याचिकेचा आधार घेऊन इतर याचिकाकर्त्यांनासुद्धा या माध्यमातून पदोन्नती देण्याचा घाट जिल्हा परिषदेमध्ये काही घटकांनी घातला असल्याची जोरदार चर्चा सध्या जिल्ह्यात आहे. त्यामुळे १८ मार्च रोजी झालेल्या पदोन्नती प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न निर्माण झालेले असताना पुन्हा एकदा तशीच प्रक्रिया राबविली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा परिणाम म्हणून शिक्षण विभागाच्या कारभाराची लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. सेवा जेष्ठ शिक्षकांना डावलून कनिष्ठ शिक्षकांना न्यायालयाच्या नावाखाली वेगळ्या पद्धतीने पदोन्नती देण्याचा घाट घातला गेल्याने जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामध्ये सेवा जेष्ठतेनुसार सीटीईटी व टीईटी पात्र शिक्षकांना डावलून ज्युनिअर शिक्षकांना पदोन्नती देण्याचा घाट सध्या जिल्हा परिषदेत घातला जात आहे. ज्युनिअर शिक्षक न्यायालयात जातात आणि तेथून पदोन्नतीचे आदेश काढतात, ही किमया फक्त नगर जिल्ह्यातच घडते. आता जवळपास ३० ते ४० शिक्षकांना तात्काळ पदोन्नती देण्याची प्रक्रिया जिल्हा परिषद सुरू असल्याची कुजबुज जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांमध्ये सुरू आहे.

पदोन्नती करताना सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करून त्यावर आठ दिवसात हरकती घ्याव्यात, त्यानंतर पुन्हा नव्याने सेवाजेष्ठ यादी प्रसिध्द करावी लागते व नंतर

पदोन्नती प्रक्रिया होते. मात्र नगर जिल्हा परिषदेत आज.. आत्ता.. ताबडतोब पदोन्नती देण्याचा अनोखा फंडा चर्चेत आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १ सप्टेंबर २०२६ रोजी एक परिपत्रक प्रसिध्द करून जिल्हा परिषदेने पदोन्नती प्रक्रिया सध्या स्थगित ठेवावी, असे सांगितले आहे. मात्र, या पत्राला केराची टोपली दाखवली आहे. कोर्टाच्या नावाखाली पदोन्नतीचा विक्रम सध्या जिल्हा परिषद सुरू आहे.

१८ मार्चला अतिशय तातडीने पदोन्नती प्रक्रिया राबवून ८० मुख्याध्यापक, ६० केंद्रप्रमुख, ५ शिक्षण विस्तार अधिकारी पदाचे प्रमोशन करण्यात आले. ही प्रक्रिया इतकी वेगवान करण्यात आली. कारण सीटीईटीचा निकाल त्यानंतर ८ दिवसात लागला. शिक्षकांच्या पदोन्नती संदर्भात वेगवेगळे याचिका दाखल असल्या तरी येथे अनेक (पान ४ वर)



### शिक्षक संघटनांची चुप्पी

जिल्हा परिषदेत या सर्व चुकीच्या गोष्टी घडत आहेत. सर्व संघटनांच्या शिक्षक नेत्यांना माहित आहे. परंतु सर्व शिक्षक संघटना या बँकेच्या बेरजेच्या राजकारणात गुंतलेल्या आहेत. या संघटनांना शिक्षणाच्या व शिक्षकांच्या प्रश्नाबाबत काही देणे घेणे राहिले नाही. फक्त यांना बँकेच्या राजकारणातच रस आहे. आम्ही इतके दिवस या संघटनेत प्रामाणिकपणे काम केले, परंतु या संघटना सध्या गप्प का आहेत? आम्ही यांच्याबरोबर राहून चूक केली, अशी प्रतिक्रिया अनेक सेवाजेष्ठ शिक्षकांनी व्यक्त केली.

# सावध ऐका निसर्गाच्या हाका ....

भास्कर खंडागळे
अतिथी संपादक
संपर्क : 9890845551

श्रीगणेशाला विघ्नहर्ता मानलं जातं.भाद्रपद महिन्यात श्रीगणेशाचे आगमन होते.त्यावेळी पावसाची कृपा झालेली असते. श्रावणसरी बरसून निसर्ग हिरवा झालेला असतो.हिरवीगार पिकेही वाऱ्यासंगे झिम्मा खेळत असतात. शेतकरीही यंदा बरकत होणार म्हणून आनंदात असतात.एकूणच गणेशोस्तव हा सर्वार्थाने आनंदोस्तव असतो.यंदा मात्र निसर्गाची अवकृपा झाली. निसर्ग कोपला. त्याची खप्पा मर्जी झाली. पावसाळा सुरु होऊन चार महिने झाले . मान्सून परतीच्या प्रवासाला निघाला.मात्र यावर्षी तो मनापासून बारसलाच नाही.श्रीगणेशाची अवकृपा झाली. गणेशोत्सवही कोरडाच गेला. खरीप हंगाम सरत आल्याने सगळ्या आशा मावळाल्या आहेत.

मोठ्या आशेने पेरलेली पिके डोळ्यादेखत जळून चालली आहेत. विहिरी कोरड्या पडल्या आहेत. जमिनी ऐन पावसाळ्यात भेगाळल्याचे भेसूर चित्र आहे. आकाशाकडे नजरा लागून असलेल्या शेतकऱ्याच्या डोळ्यातून असावे बरसत आहेत. आता सगळी आशा परतीच्या पावसावर लागल्या आहेत. मात्र पावसाची कोणतीही सुचिन्हे वा लक्षणे दिसत नाही. पावसाळ्यात कडक उन्हाळ्याची अनुभती येत आहे. असह्य उकाड्याने सगळे हैराण झाले आहेत. असे हवामान यापूर्वी अनुभवले नसल्याचे जुनीजाणती माणसे बोलून दाखवितात.एकूणच परिस्थिती भीषण असून महादुष्काळाने दस्तक दिली आहे.त्यामुळे तहान लागल्यावर विहीर खोदण्याची आदत जडलेल्या शासन आणि प्रशासनाला वेळीच जागे व्हावे लागणार आहे. मात्र अजूनही प्रशासनाला येऊ घातलेल्या संकटाची कल्पना आलेली दिसत नाही.

शासनकर्ते आणि विरोधक एकमेकांवर आरोप करण्यात धन्यता मानीत आहेत. हे चित्र योग्य नाही.

एकमेकांवर आरोप-प्रत्यरोप करण्याने काहीच साध्य होणार नाही. संकटातून मार्ग निघण्याऐवजी संकटात अधिकच भर पडणार आहे. दुष्काळावरून लक्ष राजकीय कुटाळक्याकडे जाऊन दुष्काळग्रस्त जनता उपेक्षित राहील ,याचे भान ठेवावे लागेल.आज गरज आहे ती दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देण्याची आणि सर्वतोपरी मदत करण्याची. यासाठी . तातडीने उपाययोजना करण्याची. केवळ दुष्काळ जाहीर करा एवढ्या घोषणेने भागणार नाही. याचे कारण दुष्काळाची आणि त्याच्या परिणामांची व्याप्ती भयानक असणार असून त्याचा कालावधीही पुढच्या पावसाळ्यापर्यंत इतका प्रदीर्घ असणार आहे.राज्यापुरता विचार करायचा तर पावसाची जवळपास सरासरी चाळीस टक्के एवढी मोठी तूट आहे. त्यात जो पाऊस झाला तो बहुतांश घाटमाथ्यावर,,विखूरलेला आणि असामान झालेला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्रातील बरीच धरणे भरली. मात्र मराठवाड्यातील जायकवाडी वगळता अन्य धरणांची स्थिती गंभीर आहे. विदर्भातही अशीच स्थिती आहे.

आकडेवारीचा विचार करता तब्बल एकतीस जिल्ह्यात दुष्काळी किंवा दुष्काळासदृश स्थिती आहे. यावरून दुष्काळाची भयावहता लक्षात येईल.यामुळेच शासन आणि प्रशासनाची कसोटी लागणार आहे. ऐन पावसाळ्यात अनेक जिल्ह्यातील गावे, वाड्या वास्त्यांना पाणी टंचाई जाणवत असून टँकरने पाणी पुरविणाची वेळ आली आहे.अनेक भागातील खरीपाची पिके जळून गेली आहेत. यामुळे पशुधन वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. चारापीके जळाल्याने चाऱ्यासाठी ऊसाची मोठ्याप्रमाणावर तोड होत आहे. याचा दुष्परिणाम साखर कारखान्यावर होणार आहे. साखर कारखान्यांना आधीच उसाचा तुटवडा जाणवत आहे. दुष्काळ, पाणिटंचाई, कीड व रोगाचा प्रादुर्भाव यामुळे उसाच्या उत्पादनात घट येणार आहे. त्यात चाऱ्यासाठी ऊसाची तोड होत असल्याने उसटंचाईत अधिकच भर पडणार आहे. यामुळे कारखाने साठ ते ऐशी दिवसच चालतील असा अंदाज आहे. याचा परिणाम कारखान्याचे कर्मचारी,ऊस तोडणी मजूर, आणि वाहतूकदार, अनुषंगिक स्थानिक व्यावसायिक आदिवर होणार आहे.

परतीच्या पावसाचा दिलासा मिळाला नाही, तर याचा अनिष्ट परिणाम शेती, पोल्ट्री आणि दूध व्यवसायावर होणार आहे.तसेच अन्नधान्य, भाजीपाला यांचा तुटवडा निर्माण होऊन महागाई वाढणार आहे. यासाठी शासनाला अन्नधान्याचे, भाजीपाल्याचे संभाव्य उत्पादनाचा अंदाज घेऊन आयातीचे धोरण आत्ताच निश्चित करावे लागणार आहे.तेलबियांच्या उत्पादनताही मोठी घट येण्याची शक्यता असल्याने खाद्यतेलाचाही तुटवडा निर्माण होणार आहे. यासिठीचीही उपाययोजना आत्ताच करणे योग्य ठरेल.

उपलबद्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे हि शासन यंत्रणेची अग्निपरीक्षा ठरणार आहे. कारण पाणी उपलबध असते तेव्हा त्याची उधळपट्टी केली जाते आणि ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाई उद्भवते हा अनुभव आहे. हे लक्षात घेऊन लोकांयुननाच्या नादी न लागता उपलब्ध पाण्याचे नियोजनाला प्राथमिकता द्यावी. पाणी उपलब्ध आहे म्हणून लोक बांधाऱ्यात, तलावत, नद्यात पाणी सोडा, गरज नसताना शेतीचे आवर्तन घ्या अशी मागणी करतात. विरोधकही लोकांनुनय व राजकारणासाठी आशा मागण्याना पाठबळ देतात, हे आपदकालीन स्थितीत समर्थनिय ठरत नाही.दुष्काळ निवारणासाठी मोठया आर्थिक तरतुदीची गरज भासणार आहे यासाठी काही अनुत्पादक व लोकांनुन्याच्या योजनाचा निधी दुष्काळ निवरणार्थ वळविणे अपरिहार्य ठरणार आहे. त्याचे राजकारण केले जाऊ नये.

यंदाची परिस्थिती असामान्य तसेच आव्हानाची असणार आहे. हे आव्हान शासन, विरोधक, प्रशासन तसेच जनतेला सामुदायिकपणे आणि एकजुटीने पेलावे लागणार आहे. जमेल तेथे पाणी बचत करावी लागणार आहे. कारण प्रश्न जन्ममरणाचा आहे, हे विसरता कामा नये. यासाठी निसर्गाच्या हाका सावधपनणे ऐकाव्या लागतील. कोणताही बेसावधपणा आणि बेफिकीरी आत्मघात ठरेल, इतकाच निर्वाणीचा इशारा यनिमित्त द्यावासा वाटतो.

# शेतकऱ्यांच्या अनुभवातून डाळिंब संशोधनाला नवी दिशा : डॉ. विलास खर्चे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** बदलते हवामान, नवनवीन रोग-किडी आणि उत्पादनातील आव्हानांमुळे डाळिंब शेतीसमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर डाळिंब बागायतदारांच्या प्रत्यक्ष अनुभवातून त्यांच्या समस्या, अपेक्षा व सूचना जाणून घेऊन आगामी संशोधनाची दिशा ठरविण्यात येईल, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान-२०२६ अंतर्गत विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागातील अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळ संशोधन प्रकल्पाच्या वतीने 'डाळिंब : शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यातील प्रगतिशील डाळिंब बागायतदार व विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांच्यात विविध विषयांवर थेट संवाद झाला.

डॉ. खर्चे म्हणाले, शेतकऱ्यांच्या शेतावर निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे संशोधनातून मिळाली पाहिजेत. शेतकरी व शास्त्रज्ञांमधील संवाद जितका सखोल होईल, तितके संशोधन अधिक परिणामकारक व शेतकरीकेंद्रित होईल. या सुसंवादातून मिळणारे प्रत्याभरण आगामी संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रगतिशील बागायतदार ब्रह्मदेव दुधाळ यांनी विद्यापीठाने विकसित केलेल्या 'भगवा' व 'फुले सुपर भगवा' वाणांचे कौतुक केले. जैविक खते तयार करण्याबाबत बागायतदारांसाठी शास्त्रशुद्ध प्रशिक्षण आयोजित करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बदलते हवामान, आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनवाढ, फळांची गुणवत्ता, निर्यातक्षम उत्पादन, रोग-किडींचे व्यवस्थापन, जैविक निविष्ठा व बाजारपेठेतील बदल यावर चर्चा झाली. कुलगुरू डॉ. खर्चे यांच्या हस्ते सहभागी बागायतदारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संचालक संशोधन डॉ. प्रशांत बोडके, संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाने, डॉ. भरत पाटील यांच्यासह अधिकारी, शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. आनंद चवयी यांनी केले.

# मुळा कारखान्याचा बॉयलर अग्री प्रदीपन समारंभ उत्साहात संपन्न



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** मुळा सहकारी साखर कारखान्याच्या वर्ष २०२६-२७ च्या ४९ व्या गळीत हंगामासाठी बॉयलर अग्री प्रदीपन समारंभ कारखान्याचे अध्यक्ष भाऊसाहेब मोटे व उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी कारखान्याचे संचालक भाऊसाहेब हरिभाऊ भालके व सौ.शुभांगी भाऊसाहेब भालके तसेच संचालक श्री.त्रिंबक काशिनाथ सुकाळकर व सौ.मुक्ताबाई त्रिंबक सुकाळकर यांच्या शुभहस्ते बॉयलरचा विधिवत पूजाविधि करण्यात आला.याप्रसंगी कारखान्याचे अध्यक्ष भाऊसाहेब मोटे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना हंगामाच्या शुभेच्छा दिल्या. हंगामात गळीतात व्यत्यय येणार नाही यासाठी सर्वांनीच काळजी घ्यावी आणि चांगला साखर उतारा मिळवण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन केले. कारखान्याचे साखर युनिट, वीज प्रकल्प व इथेनॉल प्रकल्प चांगल्या प्रकारे चालवून उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यावर भर द्यावा असे आवाहन कर्मचाऱ्यांना केले. गळीत हंगाम सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी ऊसतोड वाहतूक यंत्रणा वेळेत हजर होईल यादृष्टीने शेती खात्याने काळजी घ्यावी अशा सूचना केल्या. याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कारखान्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाला कारखान्याचे संचालक दिनकर अंबादास घावटे, लक्ष्मण तुळशीराम पांढरे, एकनाथ मारुती जगताप, दत्तात्रय भानुदास बऱ्हाटे, बापूसाहेब शंकर शेटे, सोपान विठ्ठल विरकर, ज्ञानेश्वर रामराव दरंदले, चंद्रकांत भानुदास टेमक, बाळासाहेब पुंजाजी भणगे, त्रिंबक काशिनाथ सुकाळकर, पांडुरंग श्रीरंग निपुंगे भाऊसाहेब हरिभाऊ भालके, शंकर पंढरीनाथ कदम, बाळासाहेब भाऊलाल परदेशी, सौ.छाया भास्कर भुसारी तसेच कारखान्याचे अधिकारी व्ही.के.भोर, रितेश टेमक, टी.आर.राऊत, एस.ए.देशमुख, योगेश घावटे, संजय टेमक, विजय फाटके, एस.डी.पवार, डी.बी.नवले, एस.डी.देशमुख आणि कर्मचारी युनियनचे पदाधिकारी दत्तात्रय निमसे व अशोकराव पवार उपस्थित होते.

# बालसंगोपन योजनेसाठी ३० कोटींचा दुसरा हप्ता
## राज्यातील दीड लाख लाभार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ३० कोटी रुपयांचा दुसरा हप्ता महिला व बालविकास विभागाच्या पुणे येथील आयुक्तालयाकडे वर्ग करण्यास राज्य सरकारने गुरुवारी मान्यता दिली. या निधीचा राज्यातील दीड लाखांहून अधिक लाभार्थ्यांना फायदा होणार असल्याची माहिती मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी दिली.

योजनेसाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात वेतनेतर अनुदान म्हणून २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ५ जून २०२६ रोजी पहिल्या हप्त्यापोटी १२० कोटी रुपये आयुक्तालयाकडे वर्ग करण्यात आले होते. त्यानंतर प्रलंबित अनुदानासाठी लाभार्थी प्रतीक्षेत होते.

२४ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार प्रलंबित अनुदान अदा करण्यासाठी आणखी ३० कोटी रुपये वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. विभागाचे कक्ष अधिकारी डॉ. निलेश पाटील यांनी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

आयुक्तालय स्तरावरून हा निधी आधार संलग्न बँक खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे जमा केला जाणार आहे. त्यामुळे आतापर्यंत २०० कोटींच्या तरतुदीपैकी १५० कोटी रुपये वर्ग झाले असून, उर्वरित ५० कोटी रुपये वर्ग होणे बाकी आहे.

# सहजयोग ध्यानधारणेचा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा प्रभागातील गायत्रीनगर येथे श्री गणेश आनंदोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून आयोजित सहजयोग ध्यानधारणेचा कार्यक्रमाला गणेश भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला नेवासा प्रभाग क्रमांक पाचमध्ये असलेल्या गायत्रीनगर या ठिकाणी झालेल्या सहजयोग ध्यान धारणेच्या कार्यक्रम प्रसंगी परमपूज्यनिय माताजी श्री निर्मलादेवी प्रणित सहजयोगाचे कार्य जगातील १६० हुन अधिक देशात चालते, सहजयोग मार्गदर्शन घेऊन ध्यानधारणेद्वारे अनेकांनी तणाव मुक्त झाल्याचे मान्य केले आहे. ध्यान धारणेने आरोग्यात सुधारणा होते,मानसिक संतुलण मिळते,विद्यार्थ्यांचे मन एकाग्र होऊन त्याचे गुणवत्तेत निश्चितपणे



वाढ होते.शेतीचे उत्पन्नात वाढ होते असे सिध्द झाल्याने माताजींना अनेक पुरस्कार बहाल केले आहेत. आपल्या सरकारने श्री माताजींना विश्वशांतीसाठी केलेल्या कामासाठी पद्मभुषनाने सन्मानित केले असल्याचे अरविंद पवार यांनी यावेळी बोलतांना सांगितले. गायत्रीनगर येथे झालेल्या सहजयोग ध्यान धारणा कार्यक्रमाला साधकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.दर शनिवारी संध्याकाळी ७ वाजता श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय समोरील सांस्कृतिक सास्कृतिक भवन येथे ध्यान केंद्र चालणार आहे. सुत्रसंचलन विधीतज्ञ सुदाम ठुबे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना विठ्ठलराव जाधव यांनी केली.कार्यक्रमाला मंडळाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते गायत्रीनगर मधील नागरिक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले.

# डॉ. कोळपे फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी गाजवला विद्यापीठ परीक्षेत ठसा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी :** डॉ. कोळपे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कोळपेवाडीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. प्रथम वर्ष बी. फार्मसीचा १०० टक्के, द्वितीय वर्षाचा ९९ टक्के, तृतीय वर्षाचा ९८ टक्के, तर अंतिम वर्षाचा ९५.८७ टक्के निकाल लागला. अंतिम वर्षात वैष्णवी घुले, अक्षदा बारगळ, कोमल आव्हाड व गायत्री आहेर यांनी प्रत्येकी ८.५५ सीजीपीए मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला. मोनाली निर्भवणे व कोमल मोकळ यांनी ८.४५ सीजीपीएसह द्वितीय, तर प्रणाली आहेर, धनश्री जपे, किरण घारे व ऋषिकेश पवार यांनी ८.३६ सीजीपीएसह तृतीय क्रमांक मिळविला.

तृतीय वर्षात साक्षी कोळपे (८.६७), द्वितीय वर्षात अंजली गावंड (८.६४), तर प्रथम वर्षात दीक्षा वाकचौरे (८.२४) यांनी प्रथम क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे प्राचार्य डॉ. दीपक पाटील व प्रा. कुलदीपक पारखे यांनी सांगितले.गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रकाश कोळपे, उपाध्यक्ष डॉ. धनंजय कोळपे, विश्वस्त डॉ. गंगासागर कोळपे, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# नेवासा पोलिसांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू : पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** प्रामाणिकपणे कायदा व सुव्यवस्था सांभाळताना कधी काही चुका झाल्या तरी नेवासा पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे आहोत, अशा शब्दांत पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी नेवासा पोलिसांचे मनोबल वाढविले. गेल्या दोन महिन्यांत नेवासा पोलीस स्टेशनच्या हद्दीत निर्माण झालेल्या विविध राजकीय व सामाजिक तणावाच्या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घेतलेली कणखर भूमिका आणि परिस्थिती हाताळण्यासाठी केलेल्या प्रामाणिक योग्य प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी गुरुवारी नेवासा पोलीस स्टेशनला आकस्मिक भेट देत संपूर्ण कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे व पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू उपस्थित होते. नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी पोलीस महानिरीक्षकांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान महानिरीक्षकांनी पोलीस स्टेशनमधील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. प्रलंबित प्रकरणे, गुन्हे तपास, कायदा व सुव्यवस्था तसेच संवेदनशील घटनांमध्ये पोलिसांनी केलेल्या कारवाईची माहिती घेत त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

अलीकडील काळात निर्माण झालेल्या राजकीय व सामाजिक तणावाच्या परिस्थितीत पोलिसांनी संयमाने आणि कणखरपणे परिस्थिती हाताळून सामाजिक शांतता कायम ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी विशेष कौतुक केले. कायदा व सुव्यवस्थेच्या कामात अनेकदा आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागतो. अशा वेळी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाठीशी वरिष्ठ अधिकारी ठामपणे उभे राहतील, आणि अशा ठिकाणी राजकीय दबावाला सुद्धा बळी पडू नका असा विश्वास महानिरीक्षकांनी व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेमुळे नेवासा पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



यावेळी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनीही नेवासा पोलीस स्टेशनच्या कामकाजाचे कौतुक केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेट देऊन प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी करण्याबरोबरच कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविल्याने या भेटीला पोलीस दलाच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश
## प्रवरा ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयात आयुर्वेद दिन साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी जीवनशैलीचा शास्त्रीय आधार आहे, हा संदेश समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसअंतर्गत प्रवरा ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने ११वा आयुर्वेद दिन विविध आरोग्यविषयक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सन्माननीय डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित उपक्रमांना विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जाणीव निर्माण करण्याबरोबरच सर्वसामान्यांना आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. योग, योग्य आहार, शिस्तबद्ध दिनचर्या आणि आरोग्यदायी जीवनपद्धती याविषयी जनजागृती करण्यात आली.

डॉ. विखे पाटील फाउंडेशन, पुणे अंतर्गत लिटल फ्लॉवर स्कूल, लोणी येथील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य मार्गदर्शन आणि योग कार्यक्रम घेण्यात आला. नियमित योगाभ्यास, संतुलित आहार, दैनंदिन जीवनातील आरोग्यदायी सवयी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

प्रवरा ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. संदीप माने, डॉ. अक्षय तुपे, डॉ. प्रशांत सरडे, डॉ. वैष्णवी सारंगधर आणि सौ. पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी लिटल फ्लॉवर स्कूलचे प्राचार्य किरण ढगे, उपप्राचार्य हर्षद निबे यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी श्रीरामपूर येथील आयुर्वेद तज्ज्ञ वैद्य सतीश भट्टड यांचे विशेष व्याख्यान झाले. बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर आयुर्वेदाचे महत्त्व, आयुर्वेदाच्या मूलभूत संकल्पना आणि चिकित्साक्षेत्रातील त्याची भूमिका यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

दरम्यान, प्रवरा हेल्थ सेंटर, राहाता येथे गरजू रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन तसेच उपचारविषयक सल्ला देण्यात आला. आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमांतून विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत 'आयुर्वेदातून निरोगी जीवनशैलीकडे' हा संदेश पोहोचविण्यात आला. उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. गणेश आहेर, प्राध्यापक डॉ. भावना गांगुर्डे, डॉ. सुरज बांगर, डॉ. अस्मिता आरसूडे , सागर गाढवे, योगेश शेंडगे शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रवरा हेल्थ सेंटरच्या संबंधितांनी विशेष परिश्रम घेतले.

# अन्नभेसळ ओळखणे गरजेचेच; त्यावर उपाय शोधणेही तितकेच महत्त्वाचे : मीनाताई जगधने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** अन्नभेसळ ही केवळ आरोग्याची समस्या नसून गंभीर सामाजिक प्रश्न आहे. अन्नभेसळ ओळखणे गरजेचे आहेच; मात्र त्यावर प्रभावी उपाय शोधणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपण दररोज सेवन करीत असलेले अन्न शुद्ध आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या व रयत शैक्षणिक संकुलाच्या प्रमुख मीनाताई जगधने यांनी केले.

रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने अन्नपदार्थांतील भेसळ व त्याच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी 'अन्नभेसळ जागृती पोस्टर्स स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. बाजारातील दूध, मसाले व विविध खाद्यपदार्थांमधील भेसळ ओळखण्याचे शास्त्रीय ज्ञान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भेसळयुक्त अन्नामुळे विविध गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे अशा उपक्रमांतून विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीस हातभार लागतो, असेही त्यांनी नमूद केले.

प्राचार्य प्रो. डॉ. प्रवीण बडधे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आरोग्यदायी आहारासोबत भेसळयुक्त व अतिप्रक्रिया केलेले पदार्थ टाळण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी दुधातील युरिया व स्टार्च, खाद्यतेल, पनीर, खवा, हळद व तिखटातील भेसळ यावर पोस्टर्स व मॉडेल्स सादर केले. आयोडीन चाचणी, लॅक्टोमीटर आदींच्या माध्यमातून भेसळ ओळखण्याचे प्रात्यक्षिकही देण्यात आले.

यावेळी डॉ. शरद शेळके, डॉ. बाबासाहेब शेंडगे, डॉ. योगिता रांधवणे, डॉ. मेघराज औटी यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी आगळे यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### नो डीजे, नो वर्गणी' उपक्रमातून जय बजरंग गणेश मंडळाचा आदर्श



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील राऊत वस्ती, संत गाडगे महाराज नगर परिसरातील जय बजरंग गणेश उत्सव तरुण मंडळाने 'नो डीजे, नो वर्गणी' या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा करत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. मंडळाच्या या उपक्रमाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी कौतुक केले. गणेशोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भजन, हरिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांचा सन्मान अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. त्यामुळे गणेशोत्सवाला केवळ मनोरंजनाची जोड न देता धार्मिक संस्कार, सामाजिक सलोखा आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न मंडळाने केला आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या शुभहस्ते श्री गणरायाचे विधिवत पूजन व आरती करण्यात आली. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी गणेशोत्सवासाठी रीतसर परवानगी घेतली असून मंडळाच्या वतीने डीजे अथवा कोणत्याही प्रकारचे वाद्य न वापरण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली.

### युवा मतदार हाच लोकशाहीचा आधार : गणेश पिंगळे



**श्रीरामपूर** : युवा मतदार हाच लोकशाहीचा खरा आधार असून १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक युवकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन स्विप नोडल अधिकारी गणेश पिंगळे यांनी केले. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अशोकनगर येथे २२० श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाच्या वतीने विशेष युवा मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता गायकवाड होत्या. या शिबिरात भारत निवडणूक आयोगाची रचना, कामकाज, लोकशाहीची मुलतत्वे, नवीन मतदार नोंदणी, नावात दुरुस्ती व पत्ता बदल या विषयी पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज भरले. यावेळी निवडणूक समन्वयक संदिप पाळंदे, पंचायत समिती शिक्षण विभागाचे इरफान शेख, सहाय्यक स्विप नोडल अधिकारी सागर माळी, बी.एल.ओ. शाम पटारे, विकास राठोड, बाळासाहेब नगरे, महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साखर उद्योगाच्या प्रश्नांवर गडकरींची मुरकुटे यांनी घेतली भेट

**श्रीरामपूर** : महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न आणि सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक अडचणींबाबत अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी साखरेचे बाजारभाव, साखर निर्यातीचे धोरण, इथेनॉल निर्मिती, ऊस उत्पादकांना वेळेवर व योग्य मोबदला देण्याचे आव्हान तसेच कारखान्यांवरील वाढता आर्थिक भार या विषयांवर चर्चा झाली. सहकारी साखर कारखान्यांशी लाखो ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक हितसंबंध जोडलेले असल्याने उद्योगातील अडचणींचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे मुरकुटे यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. साखर व इथेनॉल क्षेत्राला स्थैर्य देण्यासाठी केंद्राने आवश्यक धोरणात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. या प्रश्नांवर केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून आवश्यक उपाययोजनांसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन गडकरी यांनी दिल्याचे मुरकुटे यांनी सांगितले. यावेळी संचालक निरज मुरकुटे उपस्थित होते.

# परिस्थिती प्रतिकूल असूनही गळीत हंगाम सुरु करणे अनिवार्य : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कोळपेवाडी** : चालू वर्षी एल निनोचा प्रभाव असल्यामुळे संपूर्ण राज्यात पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झालेले आहे त्याला कारखाना कार्यक्षेत्र पण अपवाद नाही. त्यामुळे त्याचा फटका ऊस पिकांना बसला असून ऊसाची अपेक्षित वाढ झालेली नाही.परंतु दुष्काळाची परिस्थिती पाहता शासनाकडून राज्यातील सर्व साखर कारखान्यांना १५ ऑक्टोबरला गळीत हंगाम सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने नेहमीच शासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले आहे त्यामुळे परिस्थिती प्रतिकूल असूनही गळीत हंगाम सुरु करणे अनिवार्य असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या ७२ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकरावजी काळे यांच्या अध्यक्षतेखाली व कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्हा.चेअरमन दिनार कुदळे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रियाताई कुदळे यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करुन पार पडला याप्रसंगी ते बोलत होते.

आमदार आशुतोष काळे पुढे म्हणाले की, चालू वर्षीचा गळीत हंगाम आव्हानात्मक आहे. पाऊस कमी झाला आहे त्यामुळे हिवाळा पण कमी राहील अशी परिस्थिती आहे. त्यामुळे गाळप होणाऱ्या ऊसातून रिकव्हरी पण कमी मिळेल. अशा प्रकारे सर्वच बाजूंनी संकटाने वेढलेला हा गळीत हंगाम आहे. चालूवर्षी पाऊस कमी झाल्यामुळे ऊस लागवड कमी होणार आहे व काही ऊस पिकांचा उपयोग चाऱ्यासाठी केला जाणार आहे. त्यामुळे पुढील २०२७-२८चा हंगाम हा देखील अडचणीचा राहणार आहे. २०२६-२७ चा गळीत हंगाम सुरु करण्याच्या दृष्टीने ऊस तोडणी कामगारांना ॲडव्हान्स वाटप पूर्ण झाले आहे. सर्व तयारी पूर्ण करण्यात झाली असून कारखाना गाळप हंगामासाठी सज्ज झाला आहे. सर्व संकटावर मात करून हा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्वानी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

याप्रसंगी कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, शंकरराव चव्हाण, प्रवीण शिंदे, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, अनिल कदम,अशोकराव मवाळ,सुनिल मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, प्रशांत घुले, सौ. वत्सलाबाई जाधव, सौ. इंदुबाई शिंदे, श्रावण आसणे, गंगाधर औताडे, सुरेश जाधव, विष्णू शिंदे, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, डेप्यु. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, प्रॉडक्शन मॅनेजर सुर्यकांत ताकवणे सर्व विभाग प्रमुख व कामगार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे यांनी केले.सूत्रसंचालन डेप्यु. सेक्रेटरी संदीप शिरसाठ यांनी केले तर आभार संचालक सूर्यभान कोळपे यांनी मानले.

## नेवासा बुद्रुक कॉर्नरवर गतिरोधक बसवा; अन्यथा रास्तारोको

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा-श्रीरामपूर राज्य मार्गावरील नेवासा बुद्रुक कॉर्नर येथे तातडीने गतिरोधक बसवावा, अन्यथा ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सोबत घेऊन रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवा उद्योजक नितीन ऊर्फ बाळासाहेब मारकळी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, नेवासा बुद्रुक कॉर्नरवर वारंवार अपघात होत असून यापूर्वी अनेकांना जीव गमवावा लागला आहे. गतिरोधक बसविण्याबाबत आठ महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन देऊन मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्यानंतरही या ठिकाणी अनेक अपघात झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नेवासा बुद्रुक, भालगाव, गोधेगाव, सुरेगाव, बेलपिंपळगाव, जायगुडे आखाडा व साईनाथनगर परिसरातील नागरिक या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. अपघातांमध्ये या भागातील नागरिक जखमी तसेच मृत्यूमुखी पडल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

गतिरोधकाची मागणी तातडीने पूर्ण न झाल्यास रास्तारोको आंदोलन केले जाईल. त्यानंतर घडणाऱ्या दुर्घटनांना सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर मारकळी यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## डॉ. फारुख सय्यद यांना श्री विवेकानंद आरोग्य सेवा पुरस्कार




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील श्री विवेकानंद नर्सिंग होमचे आयुर्वेद महाविद्यालय व चिकित्सालय, यांच्या वतीने २३ सप्टेंबर रोजी अकराव्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. फारुख नवाब सय्यद यांना 'श्री विवेकानंद आरोग्य सेवा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. राहुरी फॅक्टरी येथील आयुर्वेद महाविद्यालयात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विवेकानंद नर्सिंग होमचे उपाध्यक्ष भारत वारुळे होते. आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंतकुमार शेकोकार यांच्या संकल्पनेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून, राहुरी पंचक्रोशीतील वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी डॉ. सय्यद यांच्या नावाची एकमताने शिफारस करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रांजली खरात, प्रास्ताविक डॉ. एम. बी. तुपे, तर आभार प्रदर्शन डॉ. संतोष बांगर यांनी केले.

## उक्कलगाव ग्रामपंचायतीत 'त्या' माहिती अधिकार अर्जामुळे खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयी एका ग्रामपंचायत सदस्याने दाखल केलेल्या माहिती अधिकाराच्या अर्जामुळे गावात मोठी खळबळ उडाली आहेत. ग्रामपंचायतीच्या 'लेखापरीक्षणाविषयी' ही माहिती मागविण्यात आली होती; परंतु महिनाभराचा कालावधी लोटूनही प्रशासनाकडून कोणतीही माहिती किंवा उत्तर न मिळाल्यामुळे गावात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणात मोठी तडजोड झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहेत. उक्कलगावमधील एका विद्यमान ग्रामपंचायत सदस्याने सुमारे पंधरा-वीस दिवसांपूर्वीच ग्रामपंचायतीकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत लेखापरीक्षणाची माहिती मागवली होती. महिनाभराचा काळ उलटूनही जन माहिती अधिकाऱ्यांकडून या अर्जावर कोणतीही कारवाई किंवा उत्तर देण्यात आलेले नाही.एका बाजूला माहिती मागवणारे ग्रामपंचायत सदस्य आणि दुसऱ्या बाजूला प्रशासनाची मौनी भूमिका, यामुळे नेमकी चूक कोणाची? असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहेत.

हा अर्ज जनतेच्या प्रश्नांची खरी तळमळ होती की केवळ एक 'फार्स'? याबाबत आता गावात दबक्या आवाजात चर्चा सुरू आहेत.विशेष म्हणजे, महिनाभराचा कालावधी संपूनही या अर्जाबाबत कोणतीही अधिकृत माहिती बाहेर आलेली नाही. दरम्यान, माहिती न मिळाल्यामुळे या प्रकरणात काहीतरी 'तडजोड' चा वास येत असल्याने सध्या गावभर रंगली आहेत. या सर्वच प्रकरणात संबंधित सदस्य कुठे तरी उपलब्ध होत असल्यामुळे नागरिकामध्ये चिड निर्माण होत आहेत. विद्यमान सदस्य नेमका कोण? याबाबत मात्र, ग्रामस्थांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली असून, या प्रकरणाचा गौप्यस्फोट नेमका कधी होणार, याकडे संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष लागून आहेत.

## नेवासा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा

### शेतकरी, पशुधनाला तातडीची मदत द्या !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : नेवासा तालुक्यात यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे नेवासा तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी व पशुपालकांना आर्थिक मदत द्यावी, चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पाणीटंचाईग्रस्त भागात टँकरने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी भाजपचे तालुका उपाध्यक्ष विशाल बापूराव धनगर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी तहसीलदार, नेवासा तसेच जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, जून ते सप्टेंबरदरम्यान अपेक्षित पाऊस न झाल्याने सोयाबीन, कापूस, ऊस, मका, बाजरी यांसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा बियाणे, खते व मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी अनेक भागांतील विहिरी व कूपनलिका आटत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत आहे.

पशुधनासाठी हिरवा तसेच वाळलेला चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर जनावरे जगविण्याचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे तालुक्यातील आवश्यक ठिकाणी शासकीय अनुदानावर चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एनडीआरएफच्या निकषांनुसार शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा करावी, तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये वाड्या-वस्त्यांवर टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी धनगर यांनी केली आहे. दुष्काळी परिस्थितीचा विद्यार्थ्यांवर होणारा आर्थिक परिणाम लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफ करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात आणि शेतकरी, पशुपालक व नागरिकांना दिलासा द्यावा, असे धनगर यांनी म्हटले आहे.

## अमृतवाहिनी एमबीएच्या सात विद्यार्थ्यांची ६.१२ लाखांच्या पॅकेजवर निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या (एआयएमबीए) एमबीए अभ्यासक्रमातील सात विद्यार्थ्यांची हाउसी कीमॅन्शन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत रिलेशनशिप मॅनेजर पदासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ६ लाख १२ हजार रुपयांचे वेतन पॅकेज मिळाले आहे. संस्थेचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे यांनी ही माहिती दिली.

या निवड प्रक्रियेत सोनल गायकवाड, ओंकार घोडके, अमोल नागरे, ओम अनेराव, आरती शिंदे, ऐश्वर्या सालबंदे आणि आकांक्षा बोरुडे यांनी यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तंत्र आणि करिअर मार्गदर्शनावर महाविद्यालयात सातत्याने भर दिला जातो.

महाविद्यालयाच्या नियुक्ती विभागामार्फत विविध कंपन्यांशी समन्वय साधून कॅम्पस मुलाखती, पूर्व-नियुक्ती प्रशिक्षण, सराव मुलाखती, गटचर्चा आणि कौशल्यविकास उपक्रम राबविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध उद्योगक्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. एकाच कंपनीत एमबीएच्या सात विद्यार्थ्यांची झालेली निवड ही महाविद्यालयाच्या उद्योगाभिमुख शिक्षणपद्धतीची उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे.

महाविद्यालयाची स्थापना सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून १९९४-९५ मध्ये झाली. महाविद्यालयाला २०२४ मध्ये 'नॅक'चे 'ए' श्रेणी मानांकन मिळाले असून व्यवस्थापनशास्त्रातील संशोधन केंद्रासही मान्यता आहे.

# आर.जे.एस. फार्मसी महाविद्यालयाची औषध जनजागृती रॅली

### स्वयंऔषधोपचार टाळण्याचा विद्यार्थ्यांचा संदेश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : फार्मसी सप्ताहानिमित्त राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ फार्मसी, कोकमठाण यांच्या वतीने नागरिकांमध्ये औषधांचा योग्य व जबाबदारीने वापर, प्रतिजैविकांचा विवेकपूर्ण वापर, स्वयंऔषधोपचाराचे दुष्परिणाम आणि आरोग्यसेवेत फार्मासिस्टची भूमिका याबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रॅलीचे उद्घाटन कोपरगाव तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष गणेश वाणी यांच्या हस्ते झाले. यावेळी औषधांचा योग्य वापर आणि रुग्णांना औषधांबाबत मार्गदर्शन करण्यात फार्मासिस्टची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. 'स्वयंऔषधोपचाराला नकार द्या, फार्मासिस्टचा सल्ला घ्या', 'औषध घेण्यापूर्वी विचार करा', 'योग्य औषध, योग्य मात्रा, योग्य वेळी' आदी घोषवाक्यांद्वारे विद्यार्थ्यांनी नागरिकांना सुरक्षित औषधोपचाराचा संदेश दिला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी दोन पथनाट्ये सादर केली.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे, प्रतिजैविकांचा अयोग्य वापर आणि चुकीची मात्रा घेण्याचे संभाव्य धोके पथनाट्यांतून प्रभावीपणे मांडण्यात आले. 'डॉक्टरांचे निदान, फार्मासिस्टचे मार्गदर्शन आणि रुग्णाची जागरूकता' ही सुरक्षित औषधोपचाराची त्रिसूत्री असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पथनाट्यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी प्राचार्य डॉ. नितीन जैन, उपप्राचार्या डॉ. उषा जैन उपस्थित होते. रॅलीच्या आयोजनासाठी संस्थाध्यक्ष चांगदेवजी कातकडे, सचिव प्रसाद कातकडे, विजय कडू, दीपक कोटमे व प्रणित कातकडे यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## शिक्षक मैदानात उतरले तर विद्यार्थीही मैदानात उतरतील : ना. विखे पाटील

### प्रवरा क्रीडा महोत्सव-२०२६चा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : मैदानी खेळामुळे आरोग्य उत्तम राहण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या कौशल्याला नवी दिशा मिळते. शिक्षकांनी मैदानात उतरून खेळले, तर विद्यार्थीही निश्चितपणे मैदानाकडे वळतील. खेळातून आरोग्य जपत संघभावनेतून प्रवरेला पुढे न्या. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या क्रीडा संस्कृतीतून येथील खेळाडू भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचतील, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित प्रवरा क्रीडा महोत्सव-२०२६च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, संरक्षण क्षेत्रातील उद्योजक गणेश निबे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, शिक्षणासोबत संघभावना, शिस्त आणि संघटितपणे काम करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी क्रीडा स्पर्धांचे महत्त्व मोठे आहे. संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबत शिक्षक व सेवकांसाठीही क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी कौतुक केले. संरक्षण क्षेत्रातील उद्योजक गणेश निबे यांनी प्रवरा संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रवरेच्या विद्यार्थ्यांना तसेच नवउद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी दिली. महोत्सवात व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, क्रिकेटसह विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धांचे नियोजन डॉ. उत्तमराव अनाप, डॉ. रमेश दळे, क्रीडा शिक्षक व सहकाऱ्यांनी केले.

## पान १ वरुन

### न्यायालयाच्या नावाखाली जिल्हा परिषदेमध्ये वेगळाच खेळ

याचिकांची श्रावणी १६ ऑटोबर रोजी होणार आहे त्यानंतर न्यायालय काय आदेश देते यावर पुढील भवितव्य अवलंबून असताना एका याचिकेच्या चार लोकांसाठी दिलेल्या निकालाच्या आधारावर चाळीस लोकांचे प्रमोशन करण्याचा घाट सध्या घातला जात असल्याने जिल्हा परिषदेच्या कारभाराबद्दल जिल्ह्यात वेगवेगळी चर्चा सुरू आहे.
केवळ सीटीईटी पात्र शिक्षक सेवाजेष्ठतेने या यादीत घुसू नये, याची दखल प्रशासनाने व ज्युनिअर शिक्षक टीमने घेतली. ज्युनियर टीम स्वतः ला खूप कायदे तज्ञ समजत आहे. यासाठी त्यांनी मोठी वर्गणी जमा केली आहे. १ सप्टेंबर २०२५ ची कट ऑफ डेट ग्राह्य धरून ही प्रक्रिया अतिशय घाईघाईने राबविण्यात आली व सेवा जेष्ठ शिक्षकांना कात्रजचा घाट दाखवला. राज्यामध्ये टीईटी, सीटीईटी पात्रतेवरून अनेक खंडपीठात याचिका दाखल आहेत. या सर्व याचिकांवर एकत्रितपणे मुंबई हायकोर्टापुढे २१ सप्टेंबर पासून सुनावणी सुरू आहे. शासनाने ही पदोन्नती बाबत कोणत्या जिल्हा परिषदेत निर्णय घेऊ नये, असे आदेश असताना व यासंबंधीच्या सर्व याचिकांची सुनावणी मुंबई खंडपीठात सुरू असताना पदोन्नती करण्यामागच इंगित काय? हे जिल्ह्यातील सर्व शिक्षकांना कळाले नाही, असा खोचक प्रश्न काही शिक्षकांनी उपस्थित केला आहे.

### लाऊडस्पीकर लावायचाय...

मर्यादेचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास, त्यांनी डिपॉझिट म्हणून जमा केलेली १ लाख रुपये किंवा ५० हजार रुपयांची रक्कम थेट जप्त केली जाईल. याशिवाय संबंधित आयोजकांवर ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक कायद्यानुसार कायदेशीर कारवाई देखील केली जाणार आहे.दरम्यान, धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान ध्वनिक्षेपकांच्या वापरावर तसेच फटाके वाजवण्यावर आणि लेझर लाईट संदर्भात आज मुंबई उच्च न्यायालय महत्त्वाचे आदेश देणार आहे. न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. नीला गोखले यांच्या आदेशाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागले आहे. मंगळवारच्या सुनावणीत धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान
सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यावर बंदी घालण्याचे संकेत उच्च न्यायालयाने दिले होते. तसेच लेझर लाईट संदर्भात देखील कोर्टाने कठोर भूमिका घेतली होती.

### शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात दोन दिवसात अधिसुनचा

अमरावती, कोकण, पुणे महसूल विभागातील पिकं, पाणी आढावा घेतल्यानंतर कृषीमंत्री नाशिक महसूल विभागाच्या दौऱ्यावर आहेत. नाशिक विभगातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची उभी पिके अडचणीत आली असून, प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा. शेतीसोबतच पशुपालन, चारा आणि पाणीटंचाईवरही तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन आणि मदत व पुनर्वसन विभागामार्फत सर्वसमावेशक अधिसूचना लवकरच काढण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले
मी स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या वेदना मला माहिती आहेत. या संकटात शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी असून, मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली शासनाची मदत त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे भरणे यांनी सांगितले.
यावेळी आमदार अमोल खताळ, कृषी आयुक्त सूरज मांढरे, जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह कृषी, महसूल, महावितरण व ग्रामविकास विभागाचे अधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

### महिला शेतकऱ्याची आत्महत्या !

कुटुंबावरअसल्याचे नातेवाईकांनी सांगितले.त्यातच काही दिवसांपूर्वी दीपाली यांच्यावर आजारपणामुळे उपचार करण्यात आले होते. उपचारासाठी झालेल्या खर्चामुळे कुटुंबाच्या आर्थिक अडचणीत आणखी भर पडली. यंदाच्या खरीप हंगामात पेरणी करूनही पुरेसा पाऊस न झाल्याने शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. पुढील काळातही पावसाची परिस्थिती समाधानकारक नसल्याने शेतीतून उत्पन्नाची शयता कमी झाली होती. कर्जाचा वाढता बोजा व आजारपणाचा उपचार याला कंटाळून दिपाली रोकडे यांनी आत्महत्या केल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.
दीपाली रोकडे यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी आणि सासू असा परिवार आहे. या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, दोन मुलांच्या डोयावरून आईचे छत्र हरपले आहे.
शेतीचे नुकसान, वाढता कर्जबोजा आणि वैद्यकीय खर्च यामुळे अडचणीत आलेल्या कुटुंबाला शासनाकडून तातडीने मदत मिळावी अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाचा मृत्यू

आले. परंतु डॉटरानी मृत घोषित केले. ही घटना बुधवारी (दि. २३ ) रात्री घडली. दरम्यान सर्वपक्षीय नेत्यांनी आक्रमक भूमिका घेऊन रास्ता रोको केला. आज गुरुवारी भिंगारमध्ये गणेश विसर्जन थांबवून कडकडीत बंद पाळण्यात आला. नगर पाथर्डी रोडवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलिसांनी लाठी चार्ज केल्याचा गंभीर आरोप करत पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. वागस्कर यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली.
बुधवारी भिंगार मध्ये गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भिंगार शहरात तणावपूर्ण वातावरण बनले. या घटनेची माहिती कळतात आ. संग्राम जगताप हे घटनास्थळी दाखल झाले. मिरवणुकी दरम्यान पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आरोप करण्यात आला. गुरुवारी सकाळी ११ वाजता संतप्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व भिंगारवाशी यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. दुपारपर्यंत हे आंदोलन सुरू होते. या आंदोलनात सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. रास्ता रोको आंदोलनामुळे नगर पाथर्डी रस्त्यावरील वाहतूक दुतर्फा ठप्प झाली होती. तसेच भिंगार शहरात गुरुवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. या पार्श्वभूमीवर भिंगार शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.
पोलीस अधिकारी, कर्मचारी सक्तीच्या रजेवर - भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान पोलिसांकडून झालेल्या लाठी चार्ज प्रकरणाची श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्यामार्फत चौकशी केली जाणार आहे. तसेच दीपक वागस्कर यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूची चौकशी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या चौकशी दरम्यान भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी थोरात यांच्यासह काही कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात येणार असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

# गौतम पब्लिक स्कूलच्या खेळाडूंची क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या गौतम पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर घातली आहे. १५ वर्षे वयोगटातील जवाहरलाल नेहरू हॉकी स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलच्या संघाने विजेतेपद मिळविले असून, हा संघ आता राज्यस्तरावर पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.
गौतम पब्लिक स्कूलच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात अहिल्यानगर ग्रामीण संघाने पुणे ग्रामीण संघाचा २-० असा पराभव केला. संघाच्या शिस्तबद्ध खेळासह संघभावना व विजयाची जिद्द यामुळे ही कामगिरी साध्य झाली. यावेळी संस्थेचे इन्स्पेक्टर नारायणराव बारे व प्राचार्य नूर शेख यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.
तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात गौतम पब्लिक स्कूलने राधाबाई काळे कन्या विद्यालयाचा पराभव करत विजेतेपद मिळविले. क्रिकेटमध्ये १७ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात गौतमने समता इंटरनॅशनल स्कूलचा १० गडी राखून पराभव केला. १४ व १७ वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेतही गौतमच्या संघांनी विजेतेपद मिळविले. १७ वर्षांखालील संघाने संजीवनी अकॅडमीवर २-० असा विजय मिळविला, तर १४ वर्षांखालील संघाने समता इंटरनॅशनल स्कूलचा पेनल्टी स्ट्रोकवर पराभव केला. कुस्ती स्पर्धेत कुमार जयेश खापरे याने सुवर्णपदक मिळविले.
खेळाडूंच्या यशाबद्दल चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे, विश्वस्त आ. आशुतोष काळे, सचिव चैतालीताई काळे, इन्स्पेक्टर नारायणराव बारे व संस्थेच्या सदस्यांनी अभिनंदन केले. दरम्यान, गौतम पब्लिक स्कूलमध्ये २८ ते ३० सप्टेंबर दरम्यान राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, विविध विभागांतील सब-ज्युनिअर व ज्युनिअर मुला-मुलींचे संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी निवास, भोजन व अन्य सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## कर्मवीरांच्या ज्ञानगंगोत्रीमुळे बहुजन समाज शिक्षण घेऊ शकला : डॉ. बाबुराव उपाध्ये



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिरसगाव** : कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी उभारलेल्या ज्ञानगंगोत्रीमुळे वंचित घटकांना शिक्षणाची दारे खुली झाली. त्यांच्या शैक्षणिक विचारांमुळे बहुजन समाज शिक्षण घेऊ शकला, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी केले.टाकळी ढोकेश्वर येथील प्रभाकरराव गणपतराव पा. खिलारी विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती झाली. यावेळी डॉ. उपाध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी पंडितराव झावरे पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी प्रा. शिवाजीराव बारगळ उपस्थित होते.प्रा. बारगळ यांनी कर्मवीरांच्या 'कमवा आणि शिका' योजनेमुळे गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाल्याचे सांगितले. श्रम आणि ज्ञानाची सांगड घालणारी शिक्षणपद्धती त्यांनी रुजविल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी डॉ. उपाध्ये यांनी वसतिगृहातील मुलींसाठी पाच डबल बेडकरिता ६५ हजार रुपयांचा धनादेश दिला. अन्य मान्यवरांनीही प्रत्येकी पाच बेडची देणगी दिली. डॉ. उपाध्ये यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना पुस्तके देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ. सुनील खिलारी यांनी केले. सूत्रसंचालन जयश्री पवार यांनी, तर आभार कर्ण रोकडे यांनी मानले.

## कर्णकर्कश आवाजात डीजे, मालकासह मंडळाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कोंढवड येथे कर्ण कर्कश आवाजात वाजणारा डिजे पोलिस पथकाने जप्त करुन कारवाई केली. तसेच डिजे मालकासह गणेश मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे डिजे व्यावसायिकां बरोबर गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली.
सध्या गणेशोत्सव साजरा करण्यात येत असुन ध्वनी प्रदुषण रोखण्या करीता अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशानुसार दि. १४ सप्टेंबर २०२६ ते २० ऑक्टोबर २०२६ या दरम्यान डॉल्बी व डिजे वाजवीण्यावर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचा वतीने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये तसेच सोशल मिडीयाच्या माध्यामातुन प्रसिध्दी देण्यात आली आहे.



दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री राहुरी तालुक्यातील कोंढवड येथे कर्ण कर्कश आवाजात डिजे वाजत होता. या बाबत अज्ञात इसमाने ११२ नंबरवर फोन करून माहिती दिली.
त्यानुसार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन कर्ण कर्कश आवाजात वाजणारा डिजे जप्त करून ताब्यात घेतला. पोलीस हवालदार संभाजी अभिमान बडे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात डिजे मालक ऋषिकेश अशोक हजारे, (वय २३ वर्षे, रा. आरडगांव), तसेच मंडळाचे अध्यक्ष भारत पोपट म्हसे, साहिल मंजाबापू म्हसे, रा. कोंढवड, ता. राहुरी, आदि मंडळाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा रजि. नं. १०८७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास हवालदार अशोक शिंदे हे करीत आहे. या कारवाईमुळे डिजे चालक, मालकांसह मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

## निधन

### सुमन भोज



**राशीन** : येथील सुमन गोपीनाथ भोज यांचे मंगळवार (दि. १५) रोजी रात्री १०.३५ वाजता राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने भोज परिवारावर शोककळा पसरली आहे.

### मुरादबी पठाण



**वडाळा महादेव** : श्रीरामपुर येथील वार्ड नं १ परीसरातील मुरादबी जब्बार पठाण (वय ५३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुले २ मुली २ सुना नातवंडे असा परीवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते जावेद पठाण व गृह रक्षक दलातील मेजर नाजीम पठाण यांच्या त्या मातोश्री होत.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGE MY OLD NAME HRISHIKESH HARISH ABHALE (BOARD CERTIFICATE ) (BEFORE NAME ) TO NEW NAME AS RUSHIKESH HARISH ABHALE (AADHAR NO.5015 1743 0299) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PIBLIC KOPARGAON PLACE : KOPARGAON DATE:-25/09/2026

**CHANGE OF NAME**
I HAVE CHANGE OLD NAME IN MY TABASSUMBANO MOHAMMADIMDADALI MOMIN (BEFORE NAME) TO NEW NAME AS TABASSUMBANO MOHAMMAD IFTEKHAR SHAIKH (AADHAR NO. 9257 7173 8397) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE- SHRIRAMPUR DATE- 24/09/2026

**CHANGE OF NAME**
I HAVE CHANGE OLD NAME IN MY MOHAMMED IFTEKHAR KMALUDDIN SHAIKH (BEFORE NAME) TO NEW NAME AS MOHAMMAD IFTEKHAR KAMALUDDIN SHAIKH (AADHAR NO. 7940 9407 5095) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE- SHRIRAMPUR DATE- 24/09/2026

**CHANGE OF NAME**
I Have Changed My Old Name **Pavan Pandit Rakte** (Board Certificate) (Before Name) To New Name As **Pawan Pandit Rakte (Aadhar No. 5311 9393 8771)** From Vide Affidavit Before Notary Public Shrirampur Place: Shrirampur Date: 24/09/2026


## सुजाता स्कूलमध्ये पर्यावरण मुक्त गणेशमूर्तीचे उत्साहात विसर्जन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**सोनई** : सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये दहा दिवस भक्तिमय, आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी संपूर्ण विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी गणेशमूर्तीचे विधिवत विसर्जन करण्यात आले.
विसर्जनापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या आरतीचा मान सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे अध्यक्ष किरण सोनवणे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी संस्थेतील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच उपस्थित भक्तांनी भक्तिभावाने गणरायाची आरती केली. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत विद्यालयात विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विशेषतः महिला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत या स्पर्धांना चांगला प्रतिसाद दिला. विविध स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या सहभागींचा उत्साह वाढविण्यासाठी बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. दहा दिवसांच्या उत्सवाची सांगता होत असताना विसर्जनाच्या दिवशी विद्यालयाच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी आणि उपस्थित भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकारने उभे राहावे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पोहेगांव** : गेल्या अकरा वर्षापासून कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथे पोहेगावचा राजा गणपती मंडळाने सामाजिक बांधिलकी राखत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले. पुरपरिस्थीत आर्थिक मदत या मंडळाने




केली होती.सध्यासध्या महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.सरकारने सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन तात्काळ दुष्काळ जाहीर करावा . शेतकरी अडचणीत असताना गोवर्धन पर्वत उचलून श्रीकृष्णाने शेतकऱ्यांना आधार दिला होता. अशाच पद्धतीने सरकारने देखील शेतकऱ्यांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहावे असे आवाहन पोहेगांव येथे पोहेगावचा राजा गणपती मंडळाने केले आहे.श्री गणेशा अभियानांतर्गत पोहेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र व पोहेगावचा राजा गणपती मंडळाच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रुग्णांना मोफत औषधे उपयोग करून देण्यात आली. गणपती बाप्पाच्या आगमनाच्या वेळी देखील अघोरी तांडव नृत्य कला सादर करून मंडळाने उपस्थितांची मने जिंकली होती.

## श्री सिद्धेश्वर बाल मंडळाचा 'विकासाचे महामेरू सुजयदादा' लक्षवेधी देखावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**अहिल्यानगर** : तोफखाना परिसरातील श्री सिद्धेश्वर बाल मंडळाच्या वतीने यंदाच्या उत्सवानिमित्त 'विकासाचे महामेरू सुजयदादा' हा आकर्षक आणि माहितीपूर्ण देखावा साकारण्यात आला आहे. शहरातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधांमधील झालेली वाढ तसेच पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांचा आढावा या देखाव्यातून मांडण्यात आला आहे.
या देखाव्यात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरात झालेल्या विविध विकासकामांना विशेष स्थान देण्यात आले आहे. शहरातील नव्याने उभारण्यात आलेले उड्डाणपूल, सुसज्ज प्रशासकीय इमारत तसेच भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयाची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. यासोबतच काँक्रीट रस्ते, नवीन उद्याने, पाणीपुरवठा व्यवस्था, शैक्षणिक सुविधा आणि नागरी विकासकामांची माहिती देणारे दिशादर्शक फलकही लक्ष वेधून घेत आहेत. पायाभूत सुविधांसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचाही प्रयत्न या देखाव्यात करण्यात आला आहे. उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांच्या वतीने शहरात राबविण्यात येत असलेल्या 'ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहीम' या उपक्रमाचाही देखाव्यात विशेष समावेश करण्यात आला आहे. देखाव्याच्या एका भागात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि अ‍ॅड. धनंजय जाधव यांच्या छायाचित्रांसह 'ग्रीन सिटी मोहीम' ठळकपणे मांडण्यात आली आहे. देखाव्याच्या तळाशी 'समृद्ध अहिल्यानगर, विकसित महाराष्ट्र' असा संदेश देणारा फलक लावण्यात आला आहे.
विकासकामांच्या प्रतिकृती, माहितीफलक आणि आकर्षक मांडणीमुळे हा देखावा नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, उत्सवाच्या निमित्ताने शहराच्या विकासाचा प्रवास आणि भविष्यातील विकासाची दिशा अधोरेखित करण्याचा प्रयत्न मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.


**छोटी जाहिरात**
श्रीरामपूर शहरालगत MIDC पासून जवळच धनगरवाडी शिवारात ११ गुंठे शेतजमीन विकणे आहे.
संपर्क : रमेश सातव ८१०४९६२३८९


## पान १ वरुन

### १५ ऑटोबरपासूनचा गाळप हंगामाचा निर्णय रद्द करा

मोर्चा काढून साखर आयुक्तालयासमोर आंदोलन करण्याचा इशाराही संघटनांनी दिला. कारखान्यांची दैनंदिन गाळप क्षमता वाढल्यामुळे हंगाम ९० ते १०० दिवसांत पूर्ण होऊ शकतो. त्यामुळे कारखाने नोव्हेंबरमध्येच सुरू करावेत, अशी मागणी संघटनांनी केली आहे.
यावेळी डॉ. जालंदर पाटील, भगवान काटे, शिवाजी माने, सावकार मादनाईक, वैभव कांबळे, जनार्दन पाटील उपस्थित होते. मागण्यांवर ७ ऑटोबरपर्यंत निर्णय न झाल्यास ८ ऑटोबरला मोर्चा काढून साखर आयुक्तालयासमोर आंदोलन करण्याचा इशाराही संघटनांनी दिला. कारखान्यांची दैनंदिन गाळप क्षमता वाढल्यामुळे हंगाम ९० ते १०० दिवसांत पूर्ण होऊ शकतो. त्यामुळे कारखाने नोव्हेंबरमध्येच सुरू करावेत, अशी मागणी संघटनांनी केली आहे.
ऊस उत्पादक आणि कारखान्यांच्या प्रमुख मागण्या
- ऊस गाळप हंगाम १५ नोव्हेंबरनंतर सुरू करावा
- साखरेची किमान विक्री किंमत ५५ रुपये प्रतिकिलो करावी
- घरगुती साखर ग्राहकांना ६० रुपयांपर्यंत उपलब्ध करून द्यावी
- कारखान्यांनी इतर महसुलातील शेतकऱ्यांच्या वाट्याचा हिशेब द्यावा
- थकीत एफआरपी व्याजासह तातडीने द्यावी
- वजनकाट्यांची अचानक तपासणी करण्याचे अधिकार भरारी पथकांना द्यावेत
-औद्योगिक, मिठाई आणि रासायनिक वापरासाठीच्या साखरेचे दर स्वतंत्र ठेवावेत


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत
७ | १७९ २५० १३३ | २ | १३८ २४६ ११० | ३ | १५७ २४८ ३५५
७९-०९-२१-६२-३८-१३

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत
४ | १५८ २५७ ४०० | १ | २४५ ३८० ११९ | ८ | १८९ २७९ ४४०
४३-५४-१७-०१-८९-५८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत
५ | १४० २५८ ३६६ | ६ | १२३ २४० ४६६ | ० | १४५ २३५ २९९
५४-१५-६२-३६-०९-२०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६


**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# द•ख•ल

## पारनेरमध्ये २९ सप्टेंबरला भव्य 'रील स्पर्धे'चे आयोजन

**पारनेर :** बैलपोळा उत्सव २०२६ निमित्त नगरसेवक पै. युवराज पठारे व सहकाऱ्यांच्या वतीने पारनेर येथे भव्य 'रील स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत ही स्पर्धा होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास ११ हजार १११ रुपये, द्वितीय क्रमांकास ८ हजार ९९९ रुपये, तृतीय क्रमांकास ७ हजार ७७७ रुपये, चतुर्थ क्रमांकास ५ हजार ५५५ रुपये, तर पंचम क्रमांकास ३ हजार ३३३ रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी किमान ४५ सेकंद किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीची र्त्रीश्रश्र कऊ १०८०ि रील तयार करणे आवश्यक आहे. रीलमध्ये क्रिएटिव्हिटी, कॉन्सेप्ट, एडिटिंग, कॅमेरा वर्क, स्टोरीटेलिंग आणि एंगेजमेंट या बाबींचा विचार केला जाणार आहे. स्पर्धकांनी रील रिळ्रीीरक्षरिंहरीशेषळलळरश्र या इंस्टाग्राम खात्यासोबत उेश्रश्ररल करून पोस्ट करणे तसेच संबंधित पेज फॉलो करणे अनिवार्य आहे. अश्लील, अपमानास्पद किंवा कोणत्याही मंडळाची प्रतिमा खराब करणारा मजकूर अथवा इफेक्ट वापरू नये, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहणार असून निकाल ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. स्पर्धेचे ठिकाण पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर आहे.

## समता ग्रामीण पतसंस्थेची २८ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न



**बेलवंडी :** बेलवंडी येथील समता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन सुनील ढवळे होते.अध्यक्षीय भाषणात बोलताना चेअरमन सुनील ढवळे म्हणाले की, १० वर्षांपूर्वी ही संस्था अत्यंत बिकट आणि डबघाईच्या स्थितीत होती. मात्र संचालक मंडळाचे प्रामाणिक प्रयत्न, सभासद आणि ठेवीदारांचा विश्वास यामुळे आज संस्था अत्यंत बळकट व ऊर्जित अवस्थेत उभी आहे. संस्थेची प्रगती सांगताना त्यांनी नमूद केले की, सध्या संस्थेकडे २ कोटी २६ लाख ठेवी असून, १ कोटी ८५ लाख कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच संस्थेला यंदा २ लाख ४४ हजार नफा झाला आहे. संस्थेच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'दीपस्तंभ' व 'बँको' हे दोन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असेही त्यांनी अभिमानाने सांगितले. याप्रसंगी ज्ञानदेव हिरवे, ऋषिकेश शेलार, सुभाष काळाने, बाळासाहेब ढवळे, विजय काळाने, हौसराव लाढाणे, सोपान हिरवे, संतोष शिंदे, किसन वऱ्हाडे, कैलास राऊत, नामदेव साळवे, त्रिंबक मुठाळ, मुरलीधर ढवळे आदींनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. या सभेस संस्थेचे व्हाईस चेअरमन अश्रुद्धिन शेख, संचालक सुनील धनवडे, सुभाष पोखरणा, सुनील खेडकर, हिरामण लाडाने, गणेश शेलार, आप्पा आरकस, प्रमोद पवार, ज्ञानेश्वर गोरे, श्रीमती सुवर्णा लांडे, कांचन घोडेकर, संतोष शेलार, अंकुश वाळके, पारस कोठारी यांच्यासह सभासद व ठेवीदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक बिपीन काळाने यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रुपेश इथापे यांनी मानले.

## कोरडगाव येथे २१ वर्षांची परंपरा जपत डी.जे.ला फाटा



**कोरडगाव :** गेल्या २१ वर्षांची वैभवशाली परंपरा कायम राखत कोरडगाव येथील अष्टविनायक गणेश मंडळाच्या श्रींच्या मूर्तीचे अतिशय शिस्तबद्ध, भावपूर्ण आणि शांततामय वातावरणात विसर्जन करण्यात आले. भपकेबाज डी. जे.च्या भिंती आणि कर्णकर्कश आवाजाला फाटा देत, पारंपरिक टाळ-मृदंगाचा गजर आणि अभंग-भारुडांच्या सुरांमध्ये गणरायाला निरोप देण्याच्या या उपक्रमाचे कोरडगावसह संपूर्ण परिसरातून विशेष कौतुक होत आहे. दुपारी ठीक ३ वाजता विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. 'गणपती बप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने आणि तुकाराम महाराजांच्या अभंगांनी, गवळणींनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. मिरवणुकीमध्ये एका तालात आणि एका सुरात चाललेला टाळ-मृदंगाचा गजर, अप्रतिम पखवाज वादन आणि गायकांच्या सुरांनी उपस्थित गणेशभक्तांना मंत्रमुग्ध केले. आजकालच्या डिजिटल युगात आणि डी.जे.च्या मोठ्या आवाजाच्या संस्कृतीत, अष्टविनायक गणेश मंडळाने जपलेली ही संस्कृती खऱ्या अर्थाने वाखाणण्याजोगी आहे. अशीच संस्कृती आणि परंपरा डी. जे.ला फाटा देऊन प्रत्येक मंडळाने जपायला हवी, अशा भावना विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या महिला भगिनी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मुखातून ऐकायला मिळत होत्या. कोणताही अनुचित प्रकार न घडता, अत्यंत शांततेत आणि पारंपरिक पद्धतीने पार पडलेला हा विसर्जन सोहळा परिसरातील इतर गणेश मंडळांसाठी एक आदर्श वस्तुपाठ ठरला आहे.

## साधना दीदींचे 'गणपती आध्यात्मिक महत्त्व' विषायावर प्रवचन

**पारनेर :** गणेशोत्सवाच्या पवित्र पर्वानिमित्त हंगा (ता. पारनेर) येथील मुंजोबा मित्र मंडळाच्या वतीने 'गणपतीचे आध्यात्मिक महत्त्व' या विषयावर विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले. गौरवदादा शिंदे मित्र मंडळाच्या सहकार्याने आयोजित या सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हिंदवी विचारधारा संस्थापक अध्यक्ष गौरव शिंदे, भाजपा युवा मोर्चा उप तालुका प्रमुख निलेश शेळके, ओंकार काळे,प्रतिमा माता, सुभाष भाई, राम भाई, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सव हा केवळ उत्सव आणि धार्मिक परंपरेपुरता मर्यादित न राहता, त्यामागील आध्यात्मिक संदेश समजून घेण्याची संधी आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी गणेशाच्या विविध अंगांचे आध्यात्मिक महत्त्व सोप्या व ओघवत्या भाषेत स्पष्ट केले. गणेशाचे मोठे मस्तक व्यापक विचारांचे, मोठे कान अधिक ऐकण्याचे, बारीक डोळे एकाग्रतेचे, सोंड परिस्थितीनुसार लवचिक राहण्याचे, एकदंत एकाग्र ध्येयाचे, विशाल उदर प्रत्येक परिस्थिती समभावाने स्वीकारण्याचे प्रतीक आहे, असे त्यांनी सांगितले. चार भुजांमधून जीवनातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना संतुलन, विवेक आणि सकारात्मकता राखण्याचा संदेश मिळतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच आत्मचिंतन, सद्विचार, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना वृद्धिंगत व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# शेतात पीक करपले, घरात पाण्याची चिंता!

### दिवसा वीज नाही, पावसाळ्यात पाऊस नाही; रात्री शेतात गेलं तर बिबट्याची भीती; शेतकऱ्यांना वाली कोण?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पावसाळा आला... पण पाऊस नाही. वीज येते... पण ती शेतकऱ्याच्या गरजेच्या वेळी नाही. आणि कधीतरी रात्री वीज आलीच, तर शेतात जाण्याच्या वाटेवर बिबट्याची दहशत उभी ठाकते. अशा विचित्र कोंडीत श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी सापडला आहे. एकीकडे पिके डोळ्यांसमोर करपून जात आहेत, दुसरीकडे पिण्याच्या पाण्याची चिंता आहे आणि पशुधनावर बिबट्याचे हल्ले होत असल्याने घरातील जनावरे वाचवायची की स्वतःचा जीव, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.शेतकरी वर्षभर कष्ट करतो. उन्हाळ्याची तमा न बाळगता जमीन तयार करतो, बियाणे पेरतो, खत टाकतो, औषधांची फवारणी करतो. पीक उभे राहते आणि त्याच्या डोळ्यांत पुन्हा आशेची पालवी फुटते. मात्र यंदा निसर्ग आणि व्यवस्थेच्या दुहेरी कात्रीत ही आशाच कोमेजताना दिसत आहे.

दिवसा वीज नाही, रात्री शेतात जाण्याची भीती आणि पावसाचा भरवसा नाही. सिंचनासाठी पाणी हवे, तर वीज हवी; वीज आली तर शेतात जावे लागते आणि रात्री शेतात गेले की बिबट्याच्या हल्ल्याची भीती. त्यामुळे शेतकऱ्याची अवस्था 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी झाली आहे.

**पिके गेली; आता पाण्याचा प्रश्न**



पावसाने ओढ दिल्याने अनेक भागांतील पिकांना पाण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र वेळेवर पाणी न मिळाल्याने हातातोंडाशी आलेली पिके करपून जळत आहेत. शेतकऱ्याच्या वर्षभराच्या श्रमाचे मोल काही दिवसांत मातीमोल होत आहे.

फक्त शेतीचेच नुकसान नाही. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होत आहे. जनावरांसाठी पाणी, चारा आणि सुरक्षितता या तीनही गोष्टींची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतीवर जगणाऱ्या कुटुंबासाठी पशुधन म्हणजे केवळ जनावरे नाहीत; ती त्यांच्या संसाराची आर्थिक आधारवड असतात.

**बिबट्याची दहशत; शेतात जाणेही धोक्याचे**

शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी रात्री शेतात जातो. परंतु परिसरात बिबट्याचा वावर असल्याने प्रत्येक पाऊल भीतीच्या सावलीत पडते. पशुधनावर हल्ले होत असल्याने शेतकरी अधिकच धास्तावला आहे.

'पशुधन वाचवावे की स्वतःचा जीव?' हा प्रश्न आता शेतकऱ्यांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. हा प्रश्न केवळ भीतीचा नाही; तर ग्रामीण भागातील बदलत्या परिस्थितीचे गंभीर वास्तव आहे.

**आस्मानी संकटांना वाली कोण?**

पाऊस नाही, वीज नाही, पाणी नाही आणि वन्यप्राण्यांची भीती आहे. संकटांची ही मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. शेतकरी मात्र प्रत्येक संकटासमोर उभा आहे-कधी आकाशाकडे पाहत, कधी विजेच्या तारांकडे आणि कधी शेताच्या बांधाकडे.

**या शेतकऱ्याच्या आस्मानी संकटांना वाली कोण?**

शासनाच्या योजना कागदावर असतील, मदतीच्या घोषणा होतील; पण प्रत्यक्ष शेताच्या बांधावर उभ्या असलेल्या शेतकऱ्याला वेळेवर वीज, पाणी आणि सुरक्षितता मिळाली नाही, तर त्या घोषणांचा उपयोग काय? शेतकऱ्याला दयेची नव्हे, तर व्यवस्थेची साथ आणि ठोस उपायांची गरज आहे.

## नगर शहरासह श्रीगोंदा तालुक्यातील महिलांचा रिपाइंमध्ये प्रवेश



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षामध्ये अहिल्यानगर शहरासह श्रीगोंदा तालुक्यातील महिलांनी जाहीर प्रवेश केला. पक्षाची ध्येयधोरणे, सामाजिक न्यायाची भूमिका आणि महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांवर विश्वास व्यक्त करत या महिलांनी रिपाइंमध्ये प्रवेश केला. रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के आणि महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार यांनी नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या महिलांचे स्वागत करून त्यांना पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पल्लवी घोडके, शशिकला कांबळे, मनीषा गायकवाड, शीतल जाधव, जया जाधव, अनिता साळवे आदी महिलांनी रिपाइंमध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी संपदा म्हस्के, शीतल नाटिकर, मनीषा गायकवाड, संजना गायकवाड, रेश्मा जाधव, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, लकी वाघमारे, स्वप्नील साठे, विल्सन रुकडीकर, जावेद सय्यद, हुसेन चौधरी आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महिलांच्या शिक्षणापासून रोजगारापर्यंत, आरोग्यापासून सुरक्षिततेपर्यंत आणि शासनाच्या विविध योजनांपासून सामाजिक न्यायाच्या प्रश्नांपर्यंत अनेक विषयांवर काम करण्याची आवश्यकता असून, यासाठी रिपाईची महिला आघाडी प्रयत्नशील असल्याचे त्या म्हणाल्या.

## भरभरून बरसू दे मेघराजा, सुखी होऊ दे बळीराजा!

### जेऊर येथे आ. अक्षय कर्डिले यांची प्रार्थना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** भरपूर पाऊस होऊ दे आणि माझा बळीराजा सुखी राहू दे अशी मनोभावे प्रार्थना आमदार अक्षय कर्डिले यांनी गणरायाच्या चरणी केली. जेऊर येथील जय श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात आ. कर्डिले यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी मंडळाच्या सदस्यांनी आ.कर्डिले यांचा सत्कार केला.

जेऊरमधील सर्वात जुने तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविणारे मंडळ म्हणून जय श्रीराम मित्र मंडळाची ओळख आहे. यंदाही मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त लहान मुले, मुली, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज विविध स्पर्धा व सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम पार पडत आहेत.



**गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकीचा जागर**

जय श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने केवळ गणेशोत्सव साजरा न करता विविध वयोगटांसाठी स्पर्धा, सामाजिक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे जेऊरच्या गणेशोत्सवाला सामाजिक एकोप्याची किनार लाभली आहे.

आरतीनंतर बोलताना आमदार कर्डिले म्हणाले, सध्याची परिस्थिती पाहता गणरायाने कृपा करून भरपूर पाऊस पाडावा आणि बळीराजा सुखी व्हावा हीच माझी प्रार्थना आहे. बळीराजा सुखी झाला तरच गावगाडा आणि ग्रामीण अर्थचक्र गतिमान राहते. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे.

त्याच्या हातात पैसा आला तरच बाजारपेठेतही चैतन्य निर्माण होते. बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी मी सदैव प्रार्थना करतो. वरुणराजाने कृपा करून भरभरून बरसावे आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी अशी भावनाही कर्डिले यांनी व्यक्त केली.

## जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त नाकाडे फार्मसी महाविद्यालयाची जनजागृती रॅली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव :** जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री लक्ष्मणराव त्र्यंबकराव नाकाडे फार्मसी महाविद्यालय, ढोरजळगाव यांच्या वतीने ढोरजळगाव येथे 'अँटी मायक्रोबियल रेजिस्टन्स' विषयावर जनजागृती करण्यासाठी भव्य रॅली व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. औषधांचा योग्य व जबाबदार वापर, प्रतिजैविक औषधांचा अनावश्यक वापर टाळणे आणि प्रतिजैविक प्रतिरोधाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या पथनाट्यात ओम काळे, सुमित मुरदारे, सुदर्शन चितळे, यश कराड, पूनम घाडगे, सृष्टी काळे, श्रुती कळमकर, वृषाली वाघमोडे, शीतल तांबे व विलास या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत प्रभावी सादरीकरण केले.

कार्यक्रमास डॉ विश्वास जायभाय, डॉ प्रशांत बुधवंत, डॉ नामदेव दौंड, डॉ देविदास देशमुख, अरुण उकिरडे, सिद्धार्थ जायभाय, वैभव जिवडे, नरेंद्र पालवे, राजेंद्र देशमुख, डॉ प्रदीप पाटेकर, केसभट रामेश्वर, हसनभाई शेख, रविंद्र डाके, महादेव पाटेकर, अनंता उकिरडे, गणेश कराड, बाळासाहेब कराड, देविदास पाटेकर, डॉ सुधाकर लांडे, सुरेश गिरे, अण्णासाहेब पाटेकर, त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल, ढोरजळगावचे मुख्य प्रशासक सचिन कर्डिले, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनोद भोईटे, डी.एड. कॉलेजचे प्राचार्य प्रा. प्रदीप नवल, डिप्लोमा विभाग प्रमुख डॉ. सूरज गिरे, प्रा. राजेंद्र कळमकर, प्रा. विशाल फलके, प्रा. शुभम उकिरडे, अक्षय लांडे, प्रा. श्रीराम बडे, प्रा. कृष्णा पाडळे, प्रा. प्रदीप काकडे, प्रा. स्वामी शेटे, प्रा. विक्रांत व्यवहारे, प्रा. जयश्री सातपुते, प्रा. प्रिया नरवडे, प्रा. वैष्णवी विधाटे, प्रा. वैष्णवी भोसले, प्रा. आकांक्षा माळवे, गायत्री देशमुख, पूनम घाडगे, श्री. हरी मोरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात अखेर एमआरआयची सुविधा सुरू!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सर्वसामान्य नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय तपासणीची सुविधा शासकीय रुग्णालयातच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शहराध्यक्ष अतुल देव्हारे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. अहिल्यानगर जिल्हा सामान्य रुग्णालयात एमआरआय (चठख) मशीन कार्यान्वित करण्यात आली असून, ही सुविधा नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध झाली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात एमआरआय तपासणीची सुविधा उपलब्ध नसल्याने सर्वसामान्य तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना खासगी रुग्णालये किंवा निदान केंद्रांमध्ये जाऊन तपासणी करावी लागत होती. त्यामुळे एमआरआय तपासणीसाठी मोठा खर्च करावा लागत असल्याने गरीब व गरजू रुग्णांवर आर्थिक भार पडत होता. ही अडचण लक्षात घेऊन अतुल देव्हारे यांनी जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू केला.

या मागणीसाठी देव्हारे यांनी आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांच्याशी दूरध्वनी तसेच ई-मेलच्या माध्यमातून संपर्क साधला. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्याची वाढती लोकसंख्या, शासकीय रुग्णालयावर असलेला रुग्णसेवेचा मोठा भार आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणारी आर्थिक अडचण याकडे त्यांनी आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.



एमआरआय ही विविध आजार व शारीरिक समस्यांचे निदान करण्यासाठी महत्त्वाची तपासणी मानली जाते. मेंदू, मणका, सांधे, स्नायू तसेच शरीरातील विविध अवयवांशी संबंधित आजारांच्या निदानासाठी या तपासणीचा उपयोग होतो. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात ही सुविधा सुरू झाल्याने रुग्णांना उपचार प्रक्रियेत मोठी मदत मिळणार आहे. शासकीय रुग्णालयातच एमआरआयची सुविधा उपलब्ध झाल्याने सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांवरील खासगी तपासण्यांचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

# गणेश विसर्जनासाठी दोन पारंपरिक विहिरींसह १८ कृत्रिम कुंडांची निर्मिती

### पर्यावरणपूरक पद्धतीने व स्वच्छता राखत गणरायाला निरोप देण्याचे महापौरांचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : गणेशोत्सवानिमित्त गणेशभक्तांना आपल्या लाडक्या गणरायाला उत्साहपूर्ण आणि धार्मिक वातावरणात निरोप देता यावा, तसेच विसर्जनामुळे शहरातील जलस्रोत आणि पर्यावरणाचे नुकसान होऊ नये, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात दोन पारंपरिक विहिरींसह विविध ठिकाणी १८ कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे. या विसर्जनस्थळांची तसेच भिस्तबाग महाल परिसरातील स्वच्छता व विविध उपाययोजनांची महापौर ज्योतीताई गाडे यांनी पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.**

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, नगरसेविका शितलताई ढोणे, नगरसेवक महेश लोंढे, शहर अभियंता मनोज पारखे, आनंद पुंड यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशभक्तांना पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात आपल्या लाडक्या बाप्पाला धार्मिक वातावरणात निरोप देता यावा, यासाठी महापालिकेच्या वतीने दोन पारंपरिक विहिरी आणि १८ कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे.



नागरिकांची सोय व्हावी यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तीचे विसर्जन करावे तसेच विसर्जनस्थळी आणि परिसरात स्वच्छता राखावी. पूजेचे साहित्य व निर्माल्य हे निर्माल्य कलशांमध्येच टाकावे, जेणेकरून शहराची स्वच्छता कायम राखण्यास मदत होईल, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

महानगरपालिकेच्या वतीने गणेश विसर्जनासाठी शहरातील विविध भागांत कृत्रिम कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये बाळाजी बुवा विहीर, यशोदानगर विहीर, तसेच पुढील ठिकाणांचा समावेश आहे- बुरुडगाव रोड, साईनगर, बोल्हेगाव, साईनगर ओपन स्पेस, निर्मलनगर, साईबाबा मंदिराजवळील मोकळी जागा, सावेडी जॉगिंग ट्रॅक, आयुर्वेद कॉलेज परिसर, झरेकर गल्ली, केडगाव, देवी मंदिरासमोरील जागा, भूषणनगर, पाण्याच्या टाकीजवळ, सारसनगर, भिंगार नाला पुलाशेजारी, शिवनेरी चौक, स्टेशन रोड, गोविंदपुरा, यशवंत महाविद्यालय, गाडे शाळा, भिस्तबाग महाल परिसरातील दोन कृत्रिम कुंड, गांधी मैदान पटांगण, पांजरापोळ पटांगण, मार्केट यार्ड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दाणेडबरा, मोतीनगर खुली जागा, केडगाव-बोल्हेगाव जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागील जागा, ताठे मळा, जिल्हा कृषी विभाग कार्यालयाजवळ, नगर-दौंड रोड, हनुमाननगर शहर अभियंता मनोज पारखे यांनी नागरिकांनी आपल्या घराजवळील किंवा जवळच्या उपलब्ध विसर्जनस्थळी जाऊन पर्यावरणपूरक पद्धतीने आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप द्यावा, असे आवाहन केले आहे.

# भोरमध्ये आढळले भारतातील सर्वात लहान फुलपाखरू

## राजा रघुनाथराव विद्यालयात फुलली; फुलपाखरांची बाग १९ प्रजातींची नोंद

**विक्रम शिंदे । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** निसर्गाच्या अन्नसाखळीत आणि सौंदर्यात फुलपाखरांचे महत्व अधिक आहे.जैवविविधतेतील फुलपाखरांचे महत्व विदयार्थ्यांना कळावे या उद्देशाने राजा रघुनाथराव विदयालय व कनिष्ठ महाविद्यालय भोलावडे (ता.भोर) येथील आवारात खास फुलपाखरांसाठी बागेची निर्मिती करण्यात आली आहे.या निमित्याने शाळेतील शिक्षक तथा पक्षीतज्ज्ञ संतोष दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली विदयार्थ्यांना फुलपाखरू निरीक्षण करण्याची संधी मिळत आहे.भारतातील सर्वात लहान फुलपाखरु (ग्रास ज्वेल) आढळले असून आतापर्यंत १९ विविध प्रजातींची नोंद करण्यात आल्याचे मुख्याध्यापक लक्ष्मण भांगे यांनी सांगितले.फुलपाखरांना आकर्षित करण्याबरोबरच त्यांच्या अळ्यांना खाद्य मिळावे या उद्देशाने बागेत विविध होस्ट वनस्पती आणि मधुरस



देणाऱ्या फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. प्रत्येक वनस्पतीवर कोणत्या प्रजातीची अळी प्रत्यक्ष वाढते याचे निरीक्षण करण्याची संधी विद्यार्थ्यांना या बागेमुळे मिळत आहे.फुलपाखरांचे जीवनचक्र समजून घेण्यासाठी एक जिवंत अभ्यासकेंद्र बनत आहे.फुलपाखरांचे निरीक्षण, छायाचित्रण आणि नोंदी करताना विद्यार्थ्यांना स्थानिक जैवविविधतेची ओळख होत आहे.नियामक मंडळ अध्यक्ष प्रमोद गुजर, उपाध्यक्ष ॲड.मुकुंद तांबेकर, सचिव डॉ. सुरेश गोरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात असून या द्वारे निसर्गाबद्दलची उत्सुकता आणि संवर्धनाची जाणीव वाढीस लागत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

**बागेतील विविध वनस्पती आणि फुल झाडे:**

बागेत हळदीकुंकू,कोरांटी, चाफा, बेल, कढीपत्ता, पानफुटी, रुई, एरंड, आपटा, कांचन आणि वाटाकाका या वनस्पती लावल्या आहेत.यापैकी एरंड हे कॉमन कॅस्टर व अँगल्ड कॅस्टरचे, तर बेल आणि कढीपत्ता हे लाईम बटरफ्लायचे होस्ट आहेत. आपट्याचा संबंध लेमन मायग्रंटशी, रुईचा प्लेन टायगरशी आणि कोरांटीचा ग्रे पॅन्सी व लेमन पॅन्सीशी आहे.प्रौढ फुलपाखरांसाठी बागेत स्नेक वीड, घाणेरी (टणटणी), यलो अर्डेल, दिन का राजा, रातराणी, बकुळ आणि गुलाब अशी फुलझाडेही लावली आहेत.

**या फुलपाखरांची झाली नोंद :**

शाळेत भारतातील सर्वांत लहान फुलपाखरांपैकी ग्रास ज्वेलची नोंद झाली आहे. याशिवाय कॉमन क्रो, ग्रेट एगफ्लाय, कॉमन कॅस्टर, अँगल्ड कॅस्टर, कॉमन ग्रास येलो, कॉमन जे, टेल्ड जे, लेमन इमिग्रंट , प्लेन टायगर, स्ट्राइप्ड टायगर, पेल ग्रास ब्लू, डार्क ग्रास ब्लू, लाईम बटरफ्लाय, ग्रॅम ब्लू, रॉयल ब्लू, ग्रे पॅन्सी, चॉकलेट पॅन्सी आणि लेमन पॅन्सी या प्रजातीही पाहायला मिळाल्या आहेत.

## दखल

### विसर्जन मिरवणुकीत अश्लील नृत्य; सात जणांवर गुन्हा

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील कोहाळे बुद्रुक येथील मतकर वस्ती, माळशिकारेवाडी परिसरात गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान अश्लील हावभाव, अंगविक्षेप व बिभस्त नृत्य केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुधवारी रात्री नऊच्या सुमारास श्री साई समर्थ तरुण मंडळ, माळशिकारेवाडी यांच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत ट्रॅक्टर क्रमांक एमएच ४२ क्यू २६४४ आणि त्यास जोडलेल्या चारचाकी ट्रॉली क्रमांक एमएच ४२ बीएस २१२० मध्ये डॉल्बी संगीताच्या तालावर महिला नृत्यांगणांकडून सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव, अंगविक्षेप व बिभस्त नृत्य करण्यात येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकारास मंडळाचे पदाधिकारी व संबंधित व्यक्तींनी प्रोत्साहन दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगाने मंडळाच्या अध्यक्षांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६८ अन्वये नोटीस देण्यात आली होती. या नोटीसमधील सूचनांचे उल्लंघन झाल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आली.या प्रकरणी राधा संग्राम घुले, मिनाक्षी बापुराव रुपनवर, काजल नितीन शिंदे, तिघी रा. लाकडी, ता. इंदापूर; रोहित हणमंत धुमाळ, रा. गोखळी, ता. फलटण, डॉल्बी मालक; तसेच राहुल दिलीप माळशिकारे, दीपक सुभाष माळशिकारे आणि निखील जालिंदर माळशिकारे, तिघे रा. माळशिकारेवाडी, कोहाळे बुद्रुक, ता. बारामती यांच्याविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १९०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २९६, २२३, ३(५) तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियमातील कलम ११०, ११७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास : सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुलाणी करीत आहेत.

### सोमेश्वरला तांत्रिक कार्यक्षमतेचा राष्ट्रीय पुरस्कार



**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली यांच्याकडून सन २०२४-२५ साठी देशपातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय दळणवळण व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

या वेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल गुर्जर, महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्यासह विविध राज्यांचे सहकार मंत्री व मान्यवर उपस्थित होते.

कारखान्याच्या वतीने कार्यकारी संचालक राजेंद्र यादव, वर्क्स मॅनेजर नारायण नायकवडे आणि चीफ केमिस्ट शिवशंकर भोसले यांनी पुरस्कार स्वीकारला.देशपातळीवरील पुरस्कार मिळाल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम रामराजे जगताप, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळाने अधिकारी, कर्मचारी आणि सभासदांचे अभिनंदन केले. या पुरस्कारामुळे सभासद व शेतकरी वर्गातून कारखान्याचे कौतुक होत आहे.याबाबत कार्यकारी संचालक राजेंद्र यादव म्हणाले, की गेल्या वर्षी देशातील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार मिळाल्यानंतर तांत्रिक कार्यक्षमतेचा हा दुसरा देशपातळीवरील पुरस्कार कारखान्याला मिळाला आहे. या पुरस्काराचे खरे मानकरी कारखान्याचे सभासद, शेतकरी, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, ऊसतोड व वाहतूकदार, ऊसतोड मजूर आणि हितचिंतक आहेत.सन २०१३ पासून कारखान्यास विविध नामांकित संस्थांचे राज्य व देशपातळीवरील १३ पुरस्कार मिळाले आहेत. कारखान्याची प्रगती व विकासाचा चढता आलेख यापुढेही कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यादव यांनी सांगितले.

### कवठे यमाई ग्रामपंचायतीवर प्रशासक राज

**कवठे यमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील मोठ्या लोकसंख्येच्या कवठे यमाई ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून शिरूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बी. आर. गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गावडे यांनी गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयात पदभार स्वीकारून कामकाजाला सुरुवात केली. पदभार स्वीकारल्यानंतर गावडे यांनी ग्रामपंचायतीतील प्रलंबित विकासकामे, नागरिकांच्या समस्या आणि विविध कामांतील अडचणींची माहिती घेतली. प्रलंबित कामांना प्राधान्य देऊन ती प्रभावीपणे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांशी संवाद साधून गावातील विविध समस्या जाणून घेतल्या. नागरिकांच्या तक्रारी व अडचणींवर आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिल्या.

## आंबेगावच्या पूर्व भागात पावसाची हजेरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे-पारगाव, ता. आंबेगाव :** गेल्या काही दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा लागून राहिलेल्या आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गुरुवारी पावसाने दमदार हजेरी लावली. पिकांना पाण्याची गरज असतानाच पाऊस झाल्याने खरीप हंगामाला मोठा आधार मिळाला असून, शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन आकाश ढगाळ झाले. त्यानंतर तालुक्यातील विविध भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. काही ठिकाणी पावसाचा जोर अधिक होता, तर काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर त्यामुळे समाधान दिसून आले.

तालुक्यातील सोयाबीन, ऊस, फ्लॉवर, बटाटा, मका, कांदा यासह अन्य पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरणार आहे. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढून पिकांच्या वाढीस मदत होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. मात्र, पावसाचा जोर वाढल्यास शेतांमध्ये पाणी साचून पिकांचे



नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळातील पावसाच्या प्रमाणाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचून खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. परिणामी काही भागांत वाहतुकीवरही परिणाम झाला. दरम्यान, पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला.

**खरीप पिकांना नवसंजीवनी :**

पावसाची अशीच साथ कायम राहिल्यास खरीप हंगामातील पिकांना मोठा आधार मिळणार आहे. त्यामुळे आगामी काळात पाऊस किती प्रमाणात आणि किती सातत्याने पडतो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## कवठे येमाईत ६१ किलो गांजा जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर-मंचर रस्त्यावरील इचकेवाडी परिसरात शिरूर पोलिसांनी कारवाई करून ६१ किलो ३०० ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत गांजा, मोटार, मोबाईल व इतर साहित्य असा सुमारे ४० लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

बुधवारी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पोलीस हवालदार तुषार पंधारे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार इचकेवाडी परिसरात पोलिसांनी सापळा रचला. संशयित वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला.

या प्रकरणी पोपट विठ्ठल शितोळे, वय ५२, रा. इचकेवाडी, कवठे येमाई याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

जप्त केलेल्या गांजाची किंमत सुमारे ३० लाख ६१ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. शिरूर पोलिसांनी शितोळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, गांजा कुठून आणण्यात आला, तो कोणाला देण्यात येणार होता तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.



## दिवे येथे गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे, ता. पुरंदर :** दिवे परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी नवव्या दिवशी गणेशमूर्तींचे विसर्जन केले. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. गणेश विसर्जनाच्या मिरवणुका शांततेत पार पडल्या.

दिवे गावठाणातील मुख्य चौकातून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. कातोबानाथ गणेशोत्सव मंडळ, कातोबा नगर मित्र मंडळ आणि राजे उमाजी नाईक मित्र मंडळाच्या वतीने जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. मंडळांनी आकर्षक सजावट केली होती. चावडीसमोरून मुख्य रस्त्याने मिरवणूक मार्गस्थ झाली. यावेळी महिलांचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून आला.

सुमारे सहा तास चाललेल्या मिरवणुकीनंतर गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. याबाबत प्रकाश झेंडे, संतोष झेंडे, सुधीर झेंडे आणि मुरलीधर झेंडे यांनी माहिती दिली. सासवड पोलिस ठाण्याच्या वतीने मिरवणुकीदरम्यान चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पीडीसीसी बँकेला सर्वोत्तम सहकारी बँक पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सहकारी साखर उद्योगाला भरीव अर्थसाह्य देत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राष्ट्रीय सहकारी साखर संघ, नवी दिल्ली यांच्यातर्फे 'सर्वोत्तम सहकारी बँक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी बँकेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला.



नवी दिल्ली येथे नितीन गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना पीडीसीसी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे.

या वेळी राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महाराष्ट्राचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील उपस्थित होते. तसेच बँकेचे संचालक भालचंद्र जगताप, प्रवीण शिंदे, संचालिका निर्मला जागडे, पूजा बुट्टे-पाटील, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे, उपसरव्यवस्थापक अभिजित हेगडे आदी उपस्थित होते.बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे म्हणाले, ''प्रथमच दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी पीडीसीसी बँकेची निवड होणे ही पुणे जिल्ह्यातील शेतकरी सभासदांसाठी अभिमानाची बाब आहे.''मार्च २०२६ अखेर बँकेची उलाढाल ३० हजार ७६४ कोटी ७४ लाख रुपये असून, ठेवी १७ हजार १८९ कोटी १३ लाख रुपये आहेत. बँकेला ४६१ कोटी ३४ लाख रुपयांचा ढोबळ नफा आणि ७८ कोटी ७८ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे.सहकारी क्षेत्रातील नऊ आणि खासगी क्षेत्रातील २० अशा २९ साखर कारखान्यांना बँकेने ८ हजार ८७७ कोटी ९४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. ऊस उत्पादन वाढीसाठी बँकेने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित 'अजितदादा पवार कृषी समृद्धी योजना' सुरू केली आहे. या योजनेमुळे ऊस उत्पादन वाढण्यासोबतच पाणी आणि खतांची बचत होण्यास मदत होईल, असे दुर्गाडे यांनी सांगितले.

## पुणे शिक्षक मतदारसंघातून अजित गावडे इच्छुक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कवठे येमाई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी इच्छुकांच्या हालचालींना वेग आला आहे. या मतदारसंघातून ग्रामीण विकास शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अजित सोनभाऊ गावडे निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याची माहिती शिरूर तालुका शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष नागेश केदारी यांनी दिली.

येत्या २३ ऑक्टोबरला मतदान, तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवारांकडून मतदारांशी संपर्क साधण्यास सुरुवात झाली आहे. अजित गावडे यांनीही निवडणुकीच्या दृष्टीने तयारी सुरू केली असून, पुणे विभागातील विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षक मतदारांशी संपर्क साधण्यावर भर दिला आहे.

गावडे कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी : अजित गावडे हे शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांचे नातू आहेत. गावडे कुटुंब गेल्या ६० वर्षांहून अधिक काळ राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. विविध राजकीय पक्षांतील नेत्यांशी असलेले संबंध, तसेच शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षकांशी असलेला संपर्क यामुळे अजित गावडे यांची संभाव्य उमेदवारी चर्चेत आली आहे.शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन, शिक्षकांच्या विविध अडचणी आणि प्रशासकीय बाबींचा अनुभव या पार्श्वभूमीवर त्यांनी पुणे विभागातील शिक्षक मतदारांशी संपर्क वाढविला आहे. अजित गावडे यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे.

## अजित पवार जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

बारामती : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते यांच्या वतीने बारामती नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक ८ मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य तसेच अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.



आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक साहित्याची अडचण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळावा आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आत्मविश्वासाने पुढे जाता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते यांनी सांगितले. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे कार्य पुढेही सुरू ठेवण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पुणे जिल्हा अध्यक्ष संभाजी होळकर, बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण इंगळे, बारामती नगरपरिषद उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, उपगटनेते संपदा चौधर, महिला व बालकल्याण सभापती सविता जाधव, नगरसेविका धनश्री बांदल, नगरसेविका अनुप्रिता डांगे, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, विशाल जाधव, पत्रकार साधू बल्लाळ, तानाजी पाथरकर, मुख्याध्यापक नीलकंठ कापसे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते यांनी केले.

**रविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविणे ही सामाजिक बांधिलकी जपणारी बाब आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. अजितदादांच्याजयंतीनिमित्त सुरज देवकाते यांनी राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, समाजातील इतरांनीही अशा विधायक उपक्रमांसाठी पुढाकार घ्यावा,**

**-संभाजी होळकर, पुणे जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविणे ही समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणारी बाब आहे. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांना निश्चितच प्रोत्साहन मिळते. दिवंगत अजितदादांच्या जयंतीनिमित्त सुरज देवकाते यांनी राबविलेला हा उपक्रम समाजातील इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून समाधान वाटले**

**- ॲड. किरण इंगळे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

**जाहीर नोटीस**

तमाम लाकांना विशेषतः कन्हेरी, ता. बारामती, जि. पुणे येथील व परिसरातील लोकास या जाहिर नाटीसीन कळविणत यत की,खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकत ही १) कैलास आण्णा आटोळे, २). प्रकाश आण्णा आटोळे,३). विलास आण्णा आटोळे, व ४). शकुंतला आण्णा आटोळे, सर्व रा. कन्हेरी, ता. बारामती, जि. पुणे यांचे क्षेत्र आमचे अशिल यांनी विकत घेणेचे ठरवले आहे. खालील परिशिष्टातील शेतजमीन मिळकत ही सदर मालकांच्या मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत ही पूर्णतः निर्वेध, निजोखमी, बाजारहीत व हस्तांतरण योग्य असल्याचा भरवसा व खात्री आमचे अशिल यांना सदर मिळकतीच्या विद्यमान मालक वहिवाटदार यांनी दिली आहे. या ही उप्पर सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिज, बक्षिस, साठेखत, विसारपावती, तारण, कर्ज, बोजा, करार मदार, अन्न, वस्त्र, पोटगी इत्यादी अगर अन्य प्रकार कसलाही हक्क अधिकार अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालंपासून ८ दिवसाचे आत मूळ कागदपत्रांसह आमचे ऑफीसमध्ये खालील पत्त्यावर प्रत्यक्ष येवून सदर मिळकतीतील त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधाबाबत आमची खात्री पटवून द्यावी व तशी लेखी पोहोच घेवून जावी अन्यथा सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचे मालकी वहिवाटीची सदरची संपूर्ण मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व निजाखमी आहे असे समजून आगर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल हे विद्यमान मालक याचेशी खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमीन मिळकत खरेदी करणेबाबतचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.परिशिष्ट तुकडी पुणे, पोट तुकडी बारामती, में दुय्यम निबंधक सो बारामती यांचे हद्दीतील मौजे कन्हेरी ता. बारामती, जि.पुणे येथील गट नं. ३०० क्षेत्र २ हे.७५ आर, आकार १ रू.९४ पै. असून त्यापैकी समाईक अविभक्त हिश्याचे ० हे.९१ आर क्षेत्र. यांसी चतुःसिमा मूळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे असे.येणेप्रमाणे वरील केलेली मिळकत त्यातील सर्व तदमभूत चिजवस्तूसह, सर्व इजमेंटचे हक्कासह व रस्ता वापर वहिवाटीचे हक्कासह शेतजमिन मिळकत या नाटीसचा विषय असे

येणेप्रमाणे जाहीर नाटीस असे

दि.३६/०७/२०२६

**ॲड. अमोल पोपट गावडे**

ऑफिस १०३, पहिला मजला लॉयर्स इनक्लेव्ह,

भिगवण रोड, बारामती, ता-बारामती, जि-पुणे.मो.नं. ८७८८७०७६३५

द•ख•ल



## धर्माधिष्ठित साहित्य व साहित्यिकांची समाजाला गरज : डॉ. भालेराव

**पाथर्डी :** जगात फक्त हिंदू संस्कृती कडून प्रत्येकाला सात्विक रपसजीवनशैलीची शिकवण मिळते. समाजाच्या कल्याणाचा विचार करत निर्माण झालेल्या साहित्यकृती सुद्धा धर्माचाच एक भाग आहे. धर्माधिष्ठित साहित्य व साहित्यिकांची समाजाला गरज आहे, असे मत रेणुका माता मल्टीस्टेटचे संस्थापक, ज्येष्ठ अर्थतज्ञ तथा धर्मशास्त्राचे अभ्यासक प्रशांत भालेराव यांनी व्यक्त केले.गणेशोत्सवानिमित्त सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.डी. कोल्हे, तापडिया महाराज, शिवशाहीर कल्याण काळे महाराज, व्यासपीठावर उपस्थित होते. चंगळवाद, भोगवाद वाढत चालल्याने धर्माचरणाचा विसर पडत दारिद्र्य, दुःख, रोग, अशांतीच्या विळख्यात समाज भरडून निघत आहे. साहित्य क्षेत्रात आपल्या कलाकृतीतून धर्म विचारांची उजळणी करत नव्या पिढीला वाचवण्यासाठी अधिक सक्रिय करण्याची गरज आहे. स्वधर्माचे पालन म्हणजे अन्य धर्माचा तिरस्कार नसून आदर्श व उच्च जीवनमूल्य अंगीकारत सन्मार्गाची ती एक वाटचाल ठरते. साहित्य सुद्धा धर्माचाच एक भाग आहे. करता करविता ईश्वर आहे. आपण केवळ त्याने नियत केलेले कार्य करतो. अशी श्रद्धा मनी बाळगत दैनंदिन वाटचाल केल्याने जीवनामध्ये निराशेचे क्षण टळून सकारात्मक वृत्ती सतत जागृत राहते. अशा सकारात्मक भावनेतून साहित्य, कला, संस्कृती, धर्म व समाज बांधणीची केलेली सेवा सुद्धा ईश्वर सेवा ठरते.

## ग्रामीण आरोग्य प्रकल्पात आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिवस उत्साहात



**राशीन :** ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड येथे आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक डॉ.रणजित रावसाहेब राऊत यांनी उपस्थित विद्यार्थी व सहभागी सदस्यांना गिधाडांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांच्या संवर्धनाची गरज तसेच गिधाडांच्या संख्येत होत असलेली घट याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. रणजित राऊत म्हणाले की, गिधाडे ही निसर्गातील अत्यंत महत्त्वाचे स्वच्छतादूत असून मृत प्राण्यांचे अवशेष नष्ट करून पर्यावरणाचे संतुलन राखण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. गिधाडांच्या संवर्धनासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे आवश्यक असून, गिधाडांचे संरक्षण व संवर्धन ही काळाची गरज आहे. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना गिधाडांच्या विविध प्रजाती, त्यांचे अधिवास, पर्यावरणातील स्थान, गिधाडांसमोरील विविध धोके आणि त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. तसेच गिधाड संवर्धन विषयक माहितीपत्रके व भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचे समाजसेवक जयेश कांबळे, मोबाईल टीमचे सदस्य मधुकर वाळूंजकर, सुरेखा सोनवणे तसेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस तुळजापूर चे विद्यार्थी अभिजित दाभणे, प्रशांत कुमार, रोहित ससाणे, नुपूर येवले, रूकुनुवो लिगीस व मयुखा व्ही. यांची उपस्थिती होती. ग्रामीण आरोग्य प्रकल्पाचे संचालक डॉ. रवी दादा आरोळे व डॉ. शोभा ताई आरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये गिधाडांविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून जैवविविधता व वन्यजीव संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## सदिच्छा मित्र मंडळाचा गणेशोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा



**राशीन :** मंगळवार पेठ, राशीन येथील पहिले गणेश मंडळ म्हणून ओळख असलेल्या सदिच्छा मित्र मंडळाचा गणेशोत्सव यंदाही मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. गणेशमूर्तीची परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आकर्षक घोड्याच्या बग्गीत गणेशमूर्ती विराजमान करण्यात आली होती. अमर ब्रास बँड, बारामती यांच्या वाद्यांच्या गजरात तसेच 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, श्री जगदंबा देवी मंदिराच्या सिंहाच्या बाहेरील आवारात दरवर्षी गणेशमूर्तीची स्थापना करण्यात येते. देवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक गणपतीचेही दर्शन घेत असल्याने या ठिकाणी भक्तिमय वातावरण निर्माण होते. या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन अरुण रेणुकर, वसीम तांबोळी, शुभम रेणुकर. योगेश काळे तसेच अशोक काळे, वैभव रेणुके, विकास नाना वाघमारे यांच्यासह मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## समर्थ शैक्षणिक संकुलात गणेशोत्सव भक्तिमय वातावरणामध्ये संपन्न

**निघोज :** समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे यावर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सांस्कृतिक जाणीव आणि कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने गणेशोत्सवाच्या कालावधीत विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समर्थ शैक्षणिक संकुलातील मुलांच्या वसतिगृहात तसेच राजुरी येथील मुलींच्या वसतिगृहात श्री गणेशमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध कार्यक्रमांचे नियोजन केले. त्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. राजुरी येथील मुलींच्या वसतिगृहात आयोजित करण्यात आलेला 'होम मिनिस्टर' हा विशेष कार्यक्रम आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मयूर शिंदे यांच्या नियोजना खाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातील विजेत्यांना हेडफोन, स्मार्टवॉच अशी बक्षिसे देण्यात आली.वसतिगृहातील सर्व मुलींनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध खेळ व उपक्रमांचा मनमुराद आनंद लुटला. पारंपरिक संस्कृती आणि मनोरंजन यांचा सुंदर मिलाफ असलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले. तसेच विविध शाखा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद आणि आपलेपणाची भावना वाढीस लागली. पारंपरिक वाद्यांचा गजरात, भक्तिमय व शांततापूर्ण वातावरणात करण्यात आली.

# पारनेरच्या पाणी योजनेसाठी शरद पवारांचा पुढाकार

### मुख्यमंत्र्यांकडून तत्काळ कार्यवाहीचे निर्देश



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** शहराच्या दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या ६३ कोटी ४७ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यासंदर्भात पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन व पत्र दिले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. खासदार नीलेश लंके यांच्यासह नगरपंचायतचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पारनेर शहराचा पाणीप्रश्न अनेक वर्षांपासून कायमस्वरूपी तोडग्याच्या प्रतीक्षेत आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या या योजनेला गती देण्याची मागणी पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या पाणीपुरवठा योजनेची अंदाजित किंमत ६३.४७ कोटी रुपये असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्रकल्पाला तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे आता शासनस्तरावर प्रशासकीय मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

योजनेच्या अंदाजित खर्चामध्ये जीएसटी, कामगार विभागाचे शुल्क तसेच महावितरणचे शुल्क यांचा समावेश करण्यात आला आहे. तांत्रिक स्तरावरील प्रक्रिया पूर्ण झाल्या असल्याने प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनाची अंतिम मंजुरी महत्त्वाची ठरणार आहे. पारनेर शहरासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असून, तिची अंमलबजावणी झाल्यास नागरिकांना दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पास अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत, अशी मागणी पवार यांनी केली.

पवार यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या सूचना दिल्याने पारनेरच्या पाणी योजनेच्या मंजुरीच्या प्रक्रियेला आता शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी बाळासाहेब कावरे, नितीन अडसूळ, सुभाष शिंदे, बाळासाहेब नगरे, भूषण शेलार, अमित जाधव, अर्जुन भालेकर, दादा औटी, सचिन औटी, शुभम देशमुख आणि योगेश मते उपस्थित होते. पारनेर शहराच्या पाणीप्रश्नावर सातत्याने होत असलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर आता ६३.४७ कोटी रुपयांच्या प्रस्तावित योजनेला प्रशासकीय मंजुरी आणि निधी कधी उपलब्ध होतो, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

## गणेशोत्सवात स्वच्छतेचा जागर
## मांदळी, चिंचोलीत स्वच्छता अभियान

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासोबतच सार्वजनिक स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी आणि साथीच्या आजारांना प्रतिबंध करता यावा, या उद्देशाने स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने विविध गावांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र मांदळी तसेच पारनेर तालुक्यातील चिंचोली येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्याला सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जोड मिळावी, या हेतूने संस्थेच्या वतीने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. गावातील मंदिर परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच भाविकांची वर्दळ असलेल्या परिसरातील कचरा साफ करण्यात आला.

नागरिकांनी आपल्या परिसराची स्वच्छता राखावी, कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये आणि उत्सव काळात स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र मांदळी येथे राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, गोरख चौरे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवा पाटील होळकर, साहेबराव बोडखे, भागचंद जाधव, कोंडीभाऊ फलके, युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

यानंतर पारनेर तालुक्यातील चिंचोली येथील मळगंगा देवी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मंदिर परिसरातील कचरा व अस्वच्छता दूर करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या अभियानात काशिनाथ पळसकर, विनायक मगर, भाऊसाहेब कदम यांच्यासह स्थानिक नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, गणेशोत्सव हा आनंद आणि भक्तीचा उत्सव आहे. मात्र, उत्सव साजरा करताना आपल्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे.

## कुकडीच्या अध्यक्षपदी घावटे तर गाडीकर उपाध्यक्ष

**पारनेर :** तालुका पारनेर तालुक्यातील जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. गायत्री घावटे यांची तर उपाध्यक्षपदी वैशाली गाडीलकर यांची निवड झाली. पारनेर तालुका कार्यक्षेत्र असलेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक अधिमंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध संपन्न झाली होती. कुकडीच्या इतर संचालक पदी गजानन सोमवंशी, गोविंद बडवे, नवनाथ सालके,सुरेश कारखिले,सतीश शेळके, प्रभाकर घावटे, संतोष तांबे, साहेबराव मोरे, आणि अशोक शिंदे यांची बिनविरोध निवड झाली होती. वर्षभरापूर्वी स्थापन झालेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेकडे सुमारे एक कोटी रुपयांच्या ठेवी असून सत्तर लक्ष रुपयांचे सुरक्षित कर्ज वाटप केलेले आहे. पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी या अधिमंडळाला बिनविरोध निवडून दिल्यामुळे आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो आम्ही सार्थ ठरवू आणि या पतसंस्थेला प्रगतीपथाकडे घेऊन जाऊ असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्षांनी व्यक्त केला. सहकार विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेश चाबुकस्वार यांनी कामकाज पाहिले.

## कन्हैया गणेश मंडळाचे विसर्जन



**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** गेली दहा दिवस कन्हैया दूध उद्योग समूहाच्या प्रांगणात गणपती बाप्पाची मनोभावे सेवा करुण कन्हैयाचे अधिकारी व कर्मचारी तसेच हितचिंतक मित्रमंडळ यांच्या उपस्थितीत कन्हैयाच्या गणपती बाप्पाचे बुधवार दि.२३ रोजी रात्री थाटात विसर्जन करण्यात आले. कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वे सर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली गेली दहा दिवस सकाळ संध्याकाळ महाआरती, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद अशाप्रकारे कन्हैयाचे अधिकारी व कर्मचारी तसेच हितचिंतक मित्र मंडळ यांनी मनोभावे बाप्पाची पुजा अर्चा करीत मनोभावे सेवा केली. बुधवार दि. २३ रोजी पौराहित्य करीत तसेच लंके यांच्या हस्ते महाआरती करीत गणपती बाप्पांची थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय, पारनेर तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी ६.३० ते रात्री ११ वाजेपर्यंत ढोल ताशा पिपानी स्वरात ही मिरवणूक काढण्यात आली. कन्हैयाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कन्हैया दूध उद्योग समूहाची स्थापना झाल्यापासून या ठिकाणी गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात येते तसेच दहाही दिवस विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून गणेश उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येतो.

## टंचाईच्या गावांत पाणी, चारा आणि पशुधनाला प्राधान्य

### आ. पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने गावनिहाय पाणीपुरवठा, पशुधनासाठी चारा व पाणी, अपूर्ण पाणीपुरवठा योजना आणि शेतकरी-पशुपालकांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २१) तहसील कार्यालयात झालेल्या टंचाई आढावा बैठकीत टंचाईग्रस्त गावांसाठी तातडीच्या उपाययोजनांच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. टंचाईची शक्यता असलेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता राहील, यासाठी उपलब्ध जलस्रोतांचा आढावा घेऊन पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या गावांत पाणीटंचाई निर्माण झाली आहे किंवा होण्याची शक्यता आहे, तेथे आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यास सांगण्यात आले. प्रत्येक गावातील पाणीपुरवठा योजना, जलस्रोत आणि अडचणींची माहिती नियमितपणे अद्ययावत ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले.बैठकीस तहसीलदार सचिन डोंगरे, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, गटविकास अधिकारी राणी पठारे, पशुसंवर्धन अधिकारी, मुख्याधिकारी, मंडळ कृषी अधिकारी प्रमिला चौधरी यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

**पशुधनासाठी चारा-पाण्याचे नियोजन**

टंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध राहावे, यासाठी गावनिहाय नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. तसेच मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती तपासून त्यांचा नियमित पाठपुरावा करावा, कामे प्रलंबित राहणार नाहीत आणि योजनांचा लाभ संबंधित गावांना वेळेत मिळेल, यासाठी विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**जनावरांचे टॅगिंग; पशुविम्यासाठी १५ टक्के हिस्सा**

तालुक्यातील सर्व जनावरांचे टॅगिंग प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाला देण्यात आले. पशुधनाची नोंद अद्ययावत ठेवण्याबरोबरच टंचाईच्या काळात पशुधन संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. यावेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पशुविमा काढताना शेतकऱ्यांना १५ टक्के रक्कम भरावी लागणार असून उर्वरित ८५ टक्के रक्कम शासन भरणार असल्याची माहिती दिली. या योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्याच्या सूचना आमदार पाचपुते यांनी दिल्या.

**अपूर्ण तलावांचा पिण्याच्या पाण्यासाठी वापर तपासणार**

अर्धवट अवस्थेतील तलाव आणि जलसाठ्यांचा आढावा घेऊन तेथील उपलब्ध पाण्याचा पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करता येईल का, याची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. याशिवाय पीक कापणी प्रयोग, पीक नुकसानीच्या नोंदी आणि पीक विम्याशी संबंधित कार्यवाही वेळेत पूर्ण करून शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

टंचाईशी संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा नियमित अहवाल सादर करावा तसेच शासनाच्या योजना, उपलब्ध सुविधा आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीच्या शेवटी पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी-चारा आणि शेतकऱ्यांशी संबंधित बाबींना प्राधान्य देऊन सर्व विभागांनी समन्वयाने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

## निघोज - अळकुटी जि. प. गटासाठी १२ कोटी ४० लाखाचा विकासनिधी

### ना. विखे पाटील, आ. दाते, मा.खा. सुजय विखे यांचा पाठपुरावा

**प्रतिनिधी| राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** निघोज अळकुटी जिल्हा परिषद गटातील विकासकामांसाठी राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून १२ कोटी ४० लाख रुपये निधी उपलब्ध झाला असून ही कामे लवकरच सुरू होणार असल्याची माहिती संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, दिनेश बाबर, पंकज कारखिले, भास्करराव उचाळे यांनी दिली आहे. यामध्ये शिववाडी ते मोरवाडी ते लामखडे वस्ती डांबरीकरण २ कोटी ६० लाख रुपये, निघोज ते कोल्हेवस्ती डांबरीकरण २ कोटी ८० लाख रुपये, वडनेर परिसरातील मुक्ताबाई शिव ते वाकनमळा सुकाळेवस्ती १ कोटी ९० लाख रुपये, रसाळवाडी डांबरीकरण २ कोटी ८० लाख, वाजेवाडी - बाबर मळा - बो-हाडे वस्ती वडनेर परिसर कॅनॉल रस्ता डांबरीकरण करणे ९० लाख रुपये, वडनेर - टेंभेमळा रस्ता डांबरीकरण ७० लाख रुपये, वाजेवाडी - ढोकमळा ते कॅनॉल रस्ता वडनेर परिसर ७० लाख रुपये अशाप्रकारे १२ कोटी ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून लवकरच हे काम सुरू होणार आहे. गेली आठ वर्षात नामदार विखे पाटील, आमदार दाते सर तसेच माजी खासदार विखे पाटील यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गटात कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली आहेत अशी माहिती वराळ,बाबर, कारखिले व उचाळे यांनी दिली आहे.

# विद्यार्थ्यांचा ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला निरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**कर्जत :** कर्जत शहरातील श्री श्री रविशंकर विद्यामंदिराच्या लाडक्या गणरायाला गुरुवारी शालेय विद्यार्थ्यांनी पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात निरोप दिला. विशेष म्हणजे या विसर्जन मिरवणुकीत विद्यार्थ्यांनीच ढोल-ताशा, झांज, लेझीम आणि टिपरी पथकाची जबाबदारी सांभाळत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. ना डीजेचा गोंगाट, ना कर्णकर्कश गाणींचा त्रास यामुळे रविशंकर विद्यामंदिराची श्री ची विसर्जन मिरवणूक इतरांसाठी आदर्श ठरली.

गुरुवारी सकाळी साडे आठ वाजता दादा पाटील महाविद्यालयाच्या समोरील प्रांगणापासून शहरातून रविशंकर विद्यामंदिराच्या गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने संपूर्ण परिसर विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी दुमदुमून सोडला. बाहेरील कोणताही व्यावसायिक पथक न घेता शाळेच्या विद्यार्थ्यांनीच ढोल-ताशांचा निनाद, झांजांचा गजर, लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांनी केलेले आकर्षक सादरीकरण आणि टिपरीच्या ठेक्यावर रंगलेला उत्साह यामुळे मिरवणुकीस विशेष रंगत आली. ठिकठिकाणी विद्यार्थ्यांनी सादर केलेली कला कर्जत शहरवासीयांसाठी कौतुकास पात्र ठरली.

अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कला-कौशल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि गणरायाप्रती असलेली भक्ती पाहून शेवटी शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांसोबत सहभागी होत उत्साह वाढविला. विद्यार्थ्यांनीच साकारलेल्या ढोल-ताशा, झांज, लेझीम आणि टिपरी पथकामुळे रविशंकर विद्यामंदिराची विसर्जन मिरवणूक कर्जत शहरात विशेष आकर्षण ठरली. शेवटी संस्थेचे प्रमुख कार्यवाहक अड नंदकुमार लांगोरे यांच्या हस्ते श्री ची आरती होत गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात लाडक्या गणरायास निरोप देण्यात आला.

**जेव्हा मुख्याध्यापिका विद्यार्थिनी सोबत लेझीम खेळतात**

शालेय जीवनात शिक्षकांची मुलांमध्ये आदरयुक्त भीती असते. यापेक्षा मुख्याध्यापक पदाचा दराराच वेगळा असतो. मात्र यंदा मुलींच्या लेझीम डावात मिरवणुकीच्या शेवटी मुख्याध्यापिका सविता बळे यांनी स्वता लेझीम खेळत आपले बालपण अनुभवत काही काळ आपल्या पदाची खुर्ची बाजूला ठेवली. शेवटी सर्वच शिक्षक-शिक्षकांनी लाडक्या गणरायास विद्यार्थ्यांसोबत विद्यार्थी बनत आनंदाने निरोप दिला.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



## ऋषीकेश कांबळे यांचा दुर्दैवी मृत्यू; सकाळी आढळला मृतदेह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : येथील ऋषीकेश नामदेव कांबळे (वय ३०) या तरुणाचा चारी क्रमांक १६ मधील वाहत्या पाण्यात पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २४) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे टाकळीभान परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ऋषीकेश कांबळे हा बुधवारी (दि. २३) रात्री दुचाकीवरून जात असताना चारी क्रमांक १६ मधील पाण्यात पडला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सध्या भंडारदरा जलाशयातून चारी क्रमांक १६ द्वारे शेतीसाठी आवर्तन सुरू असल्याने चारीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे.

## संगमनेर ते कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग औद्यगिक दृष्टीने महत्वपूर्ण : ना.विखे पाटील

### महायुती सरकारकडून ९७ कोटींचा निधी उपलब्ध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : नाशिक, त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर संगमनेर – वडगाव – निळवंडे – कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग १६० ड जांभूळवाडी फाट्या पर्यतचा रस्ता जिल्ह्याच्या औद्योगिक आणि अध्यात्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरेल असा विश्वास पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्यातील समनापुर येथे जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.आ. आमदार अमोल खताळ. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वरपे, उपअभियंता संजय टेकाळे यांच्यासह संगमनेर तालुका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



संगमनेर – वडगाव – निळवंडे – कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग १६०ड (जांभूळवाडी फाटा) रस्ता कामाची लांबी एकूण २० किलोमीटर असून यासाठी ९७कोटी २५ लक्ष रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. हे सुधारणा काम मे २०२७अखेर पूर्ण करण्याच्या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहील्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण केंद्र होत आहे.

समृध्दी महामार्ग आणि शिर्डी विमानतळासाठी हा मार्ग उपयुक्त करणार आहे. शिर्डी शनिशिंगणापूर तसेच अन्य अध्यात्मिक ठिकाणांना जोडणारा मार्ग येणाऱ्या भाविकांसाठी फायद्याचा ठरणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने येणार्या भाविकांची संख्या पाहाता रस्त्याची सुविधा दर्जेदार उपलब्ध व्हावी, तसेच वेळेत काम पूर्ण करण्याचेही त्यांनी सुचित केले.

## मुळा आणि प्रवरा नदीवरील बंधारे भरून देतो पण पाणी उपसू नका

### टंचाई बैठकीत ना.विखे पाटील यांचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत टंचाई बैठकीला नेवासा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुळा आणि प्रवरा नदीवरील बंधारे भरून देतो नव्या फळ्या टाकून देतो पण त्यातून पाणी उपसू नका असे आवाहन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी बोलतांना केले. संभाव्य पाणीटंचाई च्या आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नेवासा येथे आराखडा बैठकीत ना. विखे पाटील हे बोलत होते.

आ. विठ्ठलराव लंघे, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ देसरडा, माऊली पेचे, तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, मंडल अध्यक्ष मनोज पारखे, सहायक जिल्हाधिकारी हिंगे, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार डॉ. संजय बिरादार



यांच्यासह सर्वच खात्यांचे अधिकारी, नगरसेवक, तालुक्यातील विविध गावातील सरपंच उपस्थित होते. टंचाई आढावा बैठकीत बोलतांना नामदार राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की नेवासा तालुक्यामध्ये सर्वात मोठे संकट विजेचेच आहे. उपलब्ध पाणी सर्व दूर जाण्यासाठी पूर्ण दाबाने वीज पुरवठा हवा आहे. धरणे हे भरलेले असल्यामुळे बंधारे भरून देत जाऊ पण ते पाजरासाठीच आहेत.

पिण्याचे पाण्याचे नियोजन झाल्यानंतरच शेतीच्या पाण्याचा विचार करता येईल सर्वांनी गावपातळीवर उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे काटकसर करावी असे आवाहन त्यांनी केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुळा धरणाची पातळी वाढवणे आणि गाळ काढणे यामुळे दीड टीएमसी पाणी वाढणार आहे,ऑक्टोबरला पुन्हा एकदा केवळ पाणी योजनांसाठी बैठक घेण्यात येईल.विठ्ठलराव लंघे पाटील हे आमदार झाल्यापासून नेवासा तालुक्याला पाहिजे तेव्हा पाणी दिलेले आहे,तरीही बंद पाणी योजना वांबोरी चारी आणि विजेअभावी बंद पडलेल्या पाणी योजना यावर तोडगा काढण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलतांना दिली. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले की म्हणाले की मूळा आणि भंडारदर्याच्या रोटेशन बद्दल आभार पण शेतीसाठी पूर्ण दाबाने वीज पुरवठा पूर्ण आठ तास व्हावा नेवासा तालुक्यातील सर्व बंधारे भरून द्यावे तसेच बंधाऱ्यांच्या सर्व फळ्या या जुन्या झाल्या आहेत त्या देखील बदलण्याची गरज आहे सध्या तीनच गावांना टँकर चालू आहे भावी काळात टंचाई वाढू शकते त्या दृष्टीने पाणीपुरवठा योजनाची वीज बिले भरून सुरळीत करत पाट चारीची दुरुस्तीची मागणी आहे.

त्यादृष्टीने प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित नागरिकांनी व शेतकऱ्यांनी विविध प्रश्न यावेळी बोलतांना मांडले परंतु त्यांचाही बैठकीमध्ये त्यांचे ऐवजी इतरच प्रश्न जास्त आल्याने मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त केली वेळोवेळी केवळ टंचाईवर बोला असे ते आवाहन करीत होते,प्रांताधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय बिरादार यांनी उपस्थित कार्यकर्त्यांचे व नेत्यांचे आभार मानले.

## अरणगावला गणेशमूर्तीची विटंबना; ग्रामस्थांकडून निषेध

### अरणगाव कडकडीत बंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड तालुका** : जामखेड तालुक्यातील अरणगाव येथील श्री. अरणेश्वर मंदिरासमोरील सभामंडपात मित्रमंडळाने बसविलेल्या गणेशमूर्तीची अज्ञात व्यक्तीने विटंबना केल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. याशिवाय मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडण्यात आले असून घटनास्थळी एका अज्ञात व्यक्तीची चप्पल आढळून आली. या घटनेच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी अरणगाव बंद ठेवत संताप व्यक्त केला. याप्रकरणी जामखेड पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमोल सिताराम निगुडे (वय ४०, रा. अरणगाव) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. निगुडे हे मंदिराची देखभाल करतात, तर शिवानंदन त्रिंबक दावणगिरे हे मंदिराचे पुजारी आहेत. २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास निगुडे यांना रोहित चावरे यांनी दूरध्वनीवरून मंदिरात प्रकार घडल्याची माहिती दिली. दुपारी तीन ते चारच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने मंदिराच्या गाभाऱ्याचे कुलूप तोडले तसेच बाहेरील बाजूस चप्पल सोडून दिल्याचे त्यांना सांगण्यात आले.

माहिती मिळताच निगुडे यांनी मंदिराकडे धाव घेतली. त्यावेळी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने ग्रामस्थ जमा झाले होते. पाहणी केली असता गणेशमूर्तीची विटंबना झाल्याचे तसेच गाभाऱ्याचे कुलूप तोडल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे ग्रामस्थांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून ग्रामस्थ आणि गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घटनेचा निषेध केला.

त्यानंतर गणेशमूर्तीचे विसर्जन करून ग्रामस्थांनी जामखेड पोलिस ठाणे गाठले. अमोल निगुडे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश अघाव पुढील तपास करीत आहेत.

## सौर प्रकल्पाच्या लोकार्पणावरून कोपरगावात राजकीय वाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत रांजणगाव देशमुख–अंजनापूर येथे उभारण्यात आलेल्या १० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या लोकार्पणावरून कोपरगावात राजकीय वाद निर्माण झाला आहे. सुमारे ३२ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाच्या कार्यक्रमपत्रिकेत विधान परिषद सदस्य आ. विवेक कोल्हे यांचे नाव नसल्याने त्यांच्या समर्थकांनी आक्षेप घेतला. बुधवारी (दि. २३) कार्यक्रमस्थळी आ. आशुतोष काळे यांचे वाहन दाखल होताच कोल्हे समर्थकांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केली. यावेळी आ. विवेक कोल्हे यांच्या





समर्थनार्थ घोषणाही देण्यात आल्या. कार्यक्रमपत्रिकेत स्थानिक लोकप्रतिनिधीला डावलून राजशिष्टाचाराचा भंग करण्यात आल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्यालयाकडून ठरावीक नावेच घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला; मात्र या आरोपाची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, प्रकल्पाच्या लोकार्पणावरून निर्माण झालेल्या वादामुळे विकासकामाच्या श्रेयाचा मुद्दाही चर्चेत आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन कार्यक्रम आयोजित करावा, अशी भूमिका कोल्हे समर्थकांनी मांडली. रांजणगाव देशमुख येथील प्रकल्पाची १० मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली असून तो महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे कृषी वाहिन्यांना सौर ऊर्जेतून दिवसा वीजपुरवठा करण्यास मदत होणार आहे.

## गुणोरे गावचे लोकनियुक्त सरपंच सुरेश ढवळे यांच्यावरील ग्रामस्थ अविश्वास ठराव मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : गुणोरे गावचे सरपंच सुरेश ढवळे यांच्यावर गेली पंधरा दिवसांपूर्वी ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठकीत अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला होता. मात्र ढवळे हे लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आल्याने जनतेतून मतदान गुरुवार दि.२४ सप्टेंबर रोजी घेण्यात आले. अविश्वास ठरावाच्या बाजूने ६२४ तसेच ढवळे यांच्या बाजूने २६८ मतदान झाले यामध्ये २४ मते बाद झाले. पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौदाणे या वेळी उपस्थित होत्या.

सकाळी ८ वाजता मतदानास सुरुवात झाली. पाच वाजता मतपेट्या सिल करण्यात आल्या. त्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात आली. ९५५ पैकी ९१६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सरपंचपद रिक्त झाले असून पुढे सरपंच पदासाठी निर्णय प्रांताधिकारी घेणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांनी विरोधी मतदान करुण ढवळे यांच्यावर अविश्वास ठराव आणला होता. मात्र जनतेतून पुन्हा आपणच निवडून येणार अशी प्रतिक्रिया ढवळे हे व्यक्त करीत होते मात्र जनतेतून मोठ्या मताधिक्याने त्यांचा पराभव झाला असून या लोकनियुक्त मतदानाकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष वेधले गेले होते.

## श्रीरामपुरात गणेश विसर्जनासाठी कृत्रिम कुंडांसह विविध सुविधा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर नगरपरिषदेने पर्यावरणपूरक विसर्जनासाठी शहरात कृत्रिम कुंडांसह विविध ठिकाणी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिकांनी घरगुती तसेच सार्वजनिक गणेशमूर्ती नगरपरिषदेने निश्चित केलेल्या ठिकाणीच विसर्जित करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्षा कांचन सानप, आरोग्य सभापती दीपक वमने पाटील, नगरसेवक–नगरसेविका आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी केले आहे. नगरपरिषद हद्दीत गाडगे बाबा मंदिर परिसर, अंबिका महिला पतसंस्था, कांदा मार्केट आणि थत्ते मैदान येथे गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम कुंड तयार करण्यात आले आहेत. तसेच डावा व उजवा तट कालव्यालगत दहावा ओटा, नॉर्दन ब्रांच, अक्षय कॉर्नर, दळवी वस्ती, काळाराम मंदिर कॅनॉलजवळ, सरस्वती कॉलनी पुलाजवळ, गोंधवणी रोड कॅनॉल पुलाजवळ, खबडीजवळील कॅनॉल पूल आणि महानुभाव आश्रम पुलाजवळ विसर्जनाची सुविधा करण्यात आली आहे. विसर्जन व्यवस्थेसाठी नगरपरिषदेचे २८९ कर्मचारी तैनात करण्यात आले असून गणेशमूर्ती संकलन व वाहतुकीसाठी १२ वाहने, तर निर्माल्य संकलनासाठी चार वाहने उपलब्ध ठेवण्यात आली आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध विसर्जनस्थळी १२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. नॉर्दन ब्रांच व अक्षय कॉर्नर येथे जनरेटर, प्रकाशयोजना आणि ४०० मीटर बॅरिकेडिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

## ‘पावसाचा खंड’ ते ‘ई–पीक पाहणी’...

### विवेक कोल्हेंनी बैठकीत मांडले शेतकऱ्यांचे प्रश्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक** : नाशिक विभागातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि शेतीविषयक प्रश्नांवर विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत आमदार विवेक कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी मांडत तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यासह नाशिक, अहिल्यानगर, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्ह्यांचे पालकमंत्री, खासदार, आमदार व अधिकारी उपस्थित होते.




परिसरात सुमारे ४० दिवसांचा पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांवर परिणाम होत असल्याचे कोल्हे यांनी निदर्शनास आणले. पावसाचा दिवस निश्चित करण्यासाठी सध्याचा २.५ मिलिमीटरचा निकष बदलून ५ मिलिमीटर करावा, अशी मागणी त्यांनी केली. महसूल मंडळांचे क्षेत्र मोठे असल्याने प्रत्यक्ष परिस्थिती स्पष्ट होण्यासाठी दुष्काळ व मदतीचे निर्णय घेताना गावनिहाय पावसाची आकडेवारी ग्राह्य धरावी, असेही त्यांनी सांगितले. पीक विम्यासाठी उपग्रहाधारित निर्देशांकाऐवजी प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगाला अधिक महत्त्व द्यावे. तसेच पीक विमा नसलेल्या शेतकऱ्यांनाही शासनाने मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कालव्याच्या आवर्तनाची शाश्वती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा करण्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये फळबाग सोसायट्यांच्या सभासद शेतकऱ्यांचा समावेश करावा. ई–पीक पाहणीची अट शिथिल करावी, अशी मागणीही त्यांनी केली. कोपरगाव तालुक्यात केवळ ४० ते ४२ टक्के, तर अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे २६ टक्के ई–पीक पाहणी झाल्याने अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

## महिलेला घरात एकटी पाहून मारहाण; तिघांविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : घरात एकटी असलेल्या २६ वर्षीय विवाहित महिलेला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करत विनयभंग केल्याची घटना राहुरी तालुक्यातील सोनगाव परिसरात २१ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी दुपारी रस्त्याच्या वादातून रंगनाथ शिंदे याने महिलेला व तिच्या कुटुंबीयांना शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप आहे. याबाबत महिलेच्या सासूने राहुरी पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास महिला घरात एकटी असताना सुदिप रंगनाथ शिंदे, रंगनाथ रामनाथ शिंदे व छाया रंगनाथ शिंदे हे तिघे घरात आले.

‘आमच्याविरुद्ध पोलिसांत तक्रार का करता?’ असे म्हणत तिघांनी महिलेला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच अंगावरील ब्लाऊज फाडून विनयभंग केल्याचा आरोप महिलेने फिर्यादीत केला आहे. आरडाओरड केल्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी गुन्हा क्रमांक १०८६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ३३३, ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## देवळाली प्रवरा परिसरात बिबट्याचा दोन कालवडींवर हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा परिसरातील वाळुंज वस्ती येथे दि. २४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बिबट्याने दोन कालवडींवर हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. या हल्लयात एका कालवडीचा मृत्यू झाला असून दुसरी कालवड बिबट्याच्या तावडीतून बचावली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहुरी तालुक्यातील



देवळाली प्रवरा येथील रमेश सकाहरी वाळुंज व अनिता रमेश वाळुंज या दांपत्याकडे दोन कालवडी होत्या. दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ४ वाजे दरम्यान वाळुंज यांच्या घराबाहेर असलेल्या कालवडींचा ओरडण्याचा आवाज ऐकू आल्याने वाळुंज दाम्पत्याने खिडकीतून बाहेर पाहिले.

त्यावेळी एका कालवडीवर बिबट्या हल्ला करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यावेळी बिबट्याच्या तावडीतून सुटण्यासाठी दुसर्या कालवडीने खुंटीला जोरदार हिसका देत तेथून पळ काढला. त्यामुळे तिचा जीव वाचला. मात्र दुसऱ्या कालवडीवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळाल्या नंतर पत्रकार नानासाहेब उंडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच त्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनेची माहिती दिली. या घटनेमुळे वाळुंज वस्ती परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. वन विभागाने घटनास्थळी पाहणी करून पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा. तसेच नुकसानग्रस्त कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सहाय्य करावे, अशी मागणी करण्यात आली.